# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० / फाल्गुन २१, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(३) गृहनिर्माण मंत्री**<br>**(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५९**

---

### शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने पुनर्नियुक्त्या होत असल्याबाबत

**(१) * १२०४ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय कार्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने मोठ्या प्रमाणात पुनर्नियुक्त्या केली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पुनर्नियुक्त्या करण्यात येत असल्यामुळे शासनाने नवीन पद भरती बंद केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुनर्नियुक्त्या दिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पेन्शन व मानधन दिले जात असल्यामुळे राज्याच्या तिजोरीवर त्याचा भार पडत असून राज्यात अनेक तरुण युवक सुशिक्षित बेरोजगार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय कार्यालयातील सदर पुनर्नियुक्त्या बंद करुन रोजगार निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) अशी बाब आढळून आली नाही.

(२) शासन निर्णय, दिनांक १७/१२/२०१६ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी व कालावधीसाठी घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालये आवश्यकतेनुसार विषयनिहाय एमपॅनलमेंट करुन सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेऊ शकतात.

सदर नियुक्त्या ह्या नियमित मंजूर पदांवर व नियमित कामकाजासाठी करण्यात येत नसल्याने नवीन पद भरती बंद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. नियमित मंजूर रिक्त पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहित पध्दतीनेच भरण्यात येतात.

(३) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा घेतल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा होऊन विवक्षित कामे जसे पायाभूत सुविधा निर्मिती, योजनांचे मूल्यमापन, नागरी सेवा, भूसंपादन व इतर कारणांमुळे रखडलेले राष्ट्रीय महामार्ग, सिंचन इत्यादी प्रकल्प तातडीने मार्गी लागणे, तसेच यातून रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई ट्रान्स हार्बर प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(२) * ४५९ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राबविलेल्या शिवडी-न्हावाशेवा येथील ‘मुंबई ट्रान्स हार्बर’ या प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या नवी मुंबईतील ‘मरीआई सहकारी मच्छीमार संस्थेचे’ सभासद तसेच इतर गावातील अनेक प्रकल्पग्रस्त कोळी बांधवांना वगळून एमएमआरडीएने (M.M.R.D.A.) प्रकल्पग्रस्तांचे चुकीच्या पध्दतीने सर्वेक्षण करून १२२६ अनधिकृत प्रकल्पग्रस्तांची यादी तयार केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अधिकृत प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मरीआई मच्छिमार सहकारी संस्थेच्या मागणीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार १२२६ मच्छिमारांनी प्राधिकरणाकडे सादर केलेल्या अर्जांची छाननी करुन मरीआई संस्थेच्या ६१ सभासद मच्छिमारांना नुकसान भरपाईसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे. मुंबई पारबंदर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या आणि नुकसान भरपाईच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या सर्व मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्याचे प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

-----------------

## कफ परेड (मुंबई) येथील जाधवजी मेन्शन इमारतीच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(३) * १७६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६४९ ला दिनांक २६ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, कफ परेड येथील जाधवजी मेन्शन इमारतीच्या पुनर्विकास प्रकल्पात म्हाडा, गृहनिर्माण विभाग व मुंबई महानगरपालिका इमारत प्रस्ताव विभाग यांच्याकडून नियमांचे उल्लंघन झाल्या प्रकरणी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी सदर इमारतीचे बांधकाम थांबविण्याचे निर्देश दिनांक ०१ जुलै, २०१९ रोजी पावसाळी अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे जानेवारी, २०१८ पासून सभागृहात विविध संसदीय आयुधांमार्फत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहे तसेच मा.सभापती यांच्या दालनात संबंधित मंत्री महोदय व अधिकारी यांच्यात झालेल्या बैठकीमध्ये सदर इमारतीच्या पुनर्विकास प्रकल्पात अनियमितता झाल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने सदर पुनर्विकासाच्या कामात अनियमितता झाली नसल्यामुळे काम थांबविण्याची कार्यवाही करता येऊ शकत नसल्याचे नगरविकास विभागास पत्राद्वारे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे. मा.सभापती, विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/०१/२०१९ रोजी सदर प्रकरणी बैठक झाली. बैठकीतील प्राप्त इतिवृत्तानुसार मा.सभापती, विधानपरिषद महोदयांनी दिलेले निर्देश गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १२/०४/२०१९ रोजीच्या पत्रान्वये नगरविकास विभागाला कळविण्यात आले आहे. सन २०१९

मधील पावसाळी अधिवेशनात उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र.७५१ मध्ये झालेल्या चर्चेदरम्यान तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी विधानपरिषदेमध्ये दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने गृहनिर्माण विभागाच्या दिनांक ०१/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत नगरविकास विभागास कळविण्यात आलेले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३०/०९/२०१९ अन्वये नगरविकास विभागास सदर प्रकरणी नियमांचे उल्लंघन झाले नसल्याने काम थांबविण्याची कार्यवाही करता येणार नाही, असे कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याबाबत

**(४) * १०४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७७७२ ला दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद करण्यात यावी या मागणीच्या अनुषंगाने काढण्यात आलेल्या अधिसूचनेस प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींबाबत सर्व कारवाई माहे जुलै, २०१८ अखेरपर्यंत पूर्ण करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना आदेशित करण्यात आले असूनही आजमितीस कोकण विभागीय आयुक्तांकडून सदर २७ गावांच्या सूचना व हरकतींवर सुनावणी घेण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २७ गावांकरीता स्वतंत्र नगरपरिषद स्थापनेच्या संदर्भात शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे तेथील नागरिकांनी व युवकांनी “संघर्ष समिती” स्थापना करून, मागण्यांचे निवेदन देऊन, आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी पत्र क्र. जे.एस.एस/वि.प.स.१८७/२०१८ अन्वये मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास राज्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास आदींकडे लेखी निवेदन देऊन २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) २७ गावातील संघर्ष समितीकडून वेळोवेळी याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी उक्त २७ गावांसाठी नगरपरिषद गठीत करण्यासाठी प्रारूप अधिसूचनेचा मसूदा प्रसिध्द केला आहे.

सदर २७ गावांची नगरपरिषद स्थापन करण्यासाठी प्राप्त हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहिसर (मुंबई) येथे आगरी कोळी भवन बांधण्याबाबत

**(५) * १३४ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विकास आराखडा सन २०३४ मधील अंतिम मंजुरीच्या प्रक्रियेत दहिसर येथील प्रभाग क्र. ७ मधील न.भू.क्र. ३५७ या भूखंडावर आगरी कोळी भवन बांधण्याकरीता “मनोरंजन मैदान व आगरी कोळी भवन” असे संमिश्र आरक्षण बदल करण्याबाबतची मागणी दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने दहिसर येथे मुंबईतील आद्य भूमिपुत्र असलेल्या आगरी कोळी बांधवाचे भवन उभारण्यासाठी मुंबई विकास आराखडा २०३४ मध्ये आवश्यक असलेले संमिश्र आरक्षण बदल करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई विकास आराखडा-२०३४ मध्ये दहिसर येथील प्रभाग ७ येथे आगरी कोळी भवनाकरीता जागा आरक्षित करण्याबाबत योग्य ते आदेश संबंधित विभागाला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास विनंती केली आहे.

तर मा.विधानपरिषद सदस्य यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना लिहिलेल्या पत्राद्वारे न.भू.क्र. ३५७, मौजे दहिसर या भूखंडावर आगरी कोळी बांधवांकरीता मनोरंजन मैदान-समाजकल्याण केंद्र असे संमिश्र आरक्षण ठेवण्याबाबत विनंती केली आहे.
(२) बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ ला शासनाने दिनांक ८/०५/२०१८ रोजीच्या अधिसूचनेव्दारे मंजूरी दिली असून मंजूर विकास योजनेत न.भू.क्र. ३५७, मौजे दहिसर या भूभागावर आर.ओ.एस. १.२ (प्रोमेनाड) (मोठ्या आरक्षणाचा भाग) व आर.एम.एस/०३/१ (घन कचरा व्यवस्थापन सुविधा) (मोठ्या आरक्षणाचा भाग) साठी आरक्षित असून इ.ओ.एस. २.६ (मनोरंजन मैदान) इत्यादी सुविधांसाठी आरक्षित/नामनिर्देशित आहे. सदर भूभाग निवासी पट्टयात स्थित असून अस्तित्वात असलेल्या रस्त्याने बाधित आहे. सदर भूखंडाच्या काही भागावर सारभूत स्वरुपाचे फेरबदल ई.पी.आर.एन. ११ अन्वये आर.आर/०२/१ (पुनर्वसन व पुनर्स्थापन) साठी प्रस्तावित आहे. सदर ई.पी.ला अंतिम मंजूरी बाकी आहे.

मा.लोकप्रतिनिधींनी विनंती केलेली जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची असून मनोरंजन मैदानासाठी नामनिर्देशित आहे. तरी सदर जमिनीवरील वापर/आरक्षण यामध्ये बदल करावयाचा झाल्यास बृहन्मुंबई महापालिकेने त्यानुसार विकास योजना-२०३४ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये

फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनास सादर केल्यास अशा प्रस्तावावर गुणवत्तेनुसार निर्णय घेता येईल. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून फेरबदलाचा असा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील माहुल तसेच अंबापाडामधील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन इतर ठिकाणी करण्याबाबत

**(६) * १०८५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहुल तसेच अंबापाडामधील प्रकल्पबाधितांच्या कॉलनीमध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन करु नये असा स्पष्ट आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासन तसेच मुंबई महानगरपालिकेला दिले असतानाही तब्बल साडेपाच हजारांवर प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे आतापर्यंत माहुलमध्ये स्थलांतर करण्यात आल्याचे दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहुलमध्ये राहणारे अनेक रहिवाशी त्वचारोग, दमा तसेच विविध प्रकारच्या श्वसनविकारांनी त्रस्त असून दूषित पाणी व रसायनयुक्त हवेमुळे नागरिक मृत्यूच्या छायेत रहात असल्याने त्यांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वैद्यकीय उपचारांवर खर्च होत असल्यामुळे पुनर्वसित रहिवाश्यांना दरमहा रुपये १५ हजार आणि घरासाठी रुपये ४५ हजार अनामत रक्कम म्हणून देवून रहिवाश्यांचे पुनर्वसन करावे किंवा पर्यायी घरे देण्यात यावी असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला असूनही याबाबत उचित कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच मा.उच्च न्यायालयाने शासनास तसेच मुंबई महापालिकेस दिलेल्या आदेशाचे पालन न होण्याची कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील माहुल प्रकल्पबाधितांच्या कॉलनीमध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन करु नये असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहेत हे खरे आहे.

तथापि, माहुल येथील अंबापाडामध्ये कोणत्याही प्रकल्पबाधित झोपडीधारकांचे महानगरपालिकेमार्फत पुनर्वसन करण्यात आलेले नाही.

तसेच, माहुल येथील एव्हरस्माईल प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या संकुलात सन २०१२ ते सन २०१८ या कालावधीत प्रकल्पबाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन झाले असून, मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २ व ३ एप्रिल, २०१९ रोजीच्या आदेशानंतर सदर संकुलात कोणत्याही प्रकल्पबाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन महानगरपालिकेने केले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) माहुल एव्हरस्माईल येथे सन २०१३ ते जानेवारी, २०२० (आजतागायत) या कालावधीत एकूण ५१ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, सदर मृत्यू हे प्रदुषणामुळे झाले आहेत असे आढळून येत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

माहुल येथील प्रदुषणाचा प्रश्न जोपर्यंत सोडविला जात नाही तोपर्यंत माहुल येथील एव्हरस्माईल प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या संकुलामधील प्रकल्पबाधितांना इतरत्र पर्यायी सदनिका उपलब्ध करुन देण्याचे अथवा पर्यायी उपाययोजना होत नाही तोपर्यंत त्यांना मासिक भाडे रुपये १५ हजार व स्थलांतरासाठी एकवेळ सुरक्षा अनामत रक्कम म्हणून रुपये ४५ हजार देण्याबाबत निर्देश दिले होते.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २ व ३ एप्रिल, २०१९ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली आहे.

सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## पुरंदर (जि.पुणे) येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्याबाबत

**(७) * ३१८ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४७३२८ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यासाठी शासनाच्या तसेच भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी पहाणी करुन विमानतळासाठी जागा योग्य असल्याचा अहवाल दिलेला असून सदर जागेस केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाने तसेच केंद्र शासनाच्या विमान मंत्रालयाने गठन केलेल्या सुकाणू समितीने सदर जागेस साईट क्लिअरन्स दिला आहे व यासाठी आवश्यक असलेल्या इतर परवानग्या प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावित विमानतळ विकसित करण्याची जबाबदारी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे सोपविण्यात आली आहे व त्यात सिडको २०४० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून २५ कोटी ५० हजार रुपयांची प्राथमिक गुंतवणूक करण्यास सिडकोच्या संचालक मंडळाने मंजूरी दिलेली आहे व या प्रकल्पामध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीची रुपये ७६० कोटी एवढी गुंतवणूक असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे व उक्त निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व त्यासाठी कोणत्या अटी वा शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत,

(४) तसेच विमानतळाच्या कामास सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व प्रत्यक्षात काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे, प्रकल्पाचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे, प्रस्तुत प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) सदर प्रकल्पास भारत सरकारचे पर्यावरण मंत्रालय, नागरी विमान उड्डयन मंत्रालय व नागरी विमान महानिदेशालय इ. यंत्रणांचे परवाने वगळता इतर परवानग्या प्राप्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर विमानतळाच्या भूसंपादनाकरीता सुमारे रुपये ४००० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्याकरीता दिनांक २ सप्टेंबर, २०१९ रोजी Pune (Purandar) International Airport Ltd. (PIAL) या संयुक्त कंपनीची स्थापना झाली आहे. विमानतळ उभारणीचा एकूण खर्च अद्यापि निश्चित व्हावयाचा आहे.

विमानतळासाठी सर्व परवानग्या/ना हरकती प्राप्त झाल्यानंतर तसेच भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व खाजगी गुंतवणूकदार निश्चित झाल्यानंतर विमानतळाच्या बांधकामाचे काम सुरु होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबानी फाऊंडेशनकडून दंडात्मक रकमेची वसूली करण्याबाबत

**(८) * ५०८ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा : दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ४२८८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई येथील २१९४.५६ चौ. मीटरचा भूखंड एमएमआरडीएने अंबानी फाऊंडेशनला शाळा आणि खेळाच्या मैदानासाठी दिले होते मात्र एमएमआरडीएने भाडेपट्टयाची अंमलबजावणी वेळेत केली नसल्याने शासनाचे ४१.४७ कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कालमर्यादेत बांधकाम न केल्याबद्दल २३.४९ कोटी दंडाची वसूली करणे अपेक्षित असतानाही सदर दंडाची वसुली करण्यात आली नसल्याचे निष्कर्ष कॅगने काढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅगच्या निष्कर्षाची नोंद घेवून एमएमआरडीएच्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी व अंबानी फाऊंडेशनवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' ब्लॉकमधील सामाजिक सुविधाकरीता आरक्षित असलेले एस एफ-७ (२२७४.१८ चौ.मी.) व एस.एफ-९ बी (२०२४ चौ.मी.) हे दोन भूखंड रुपये १,५३,०५४/- प्रति चौ.मी. भूखंड क्षेत्र या दराने अधिमुल्य आकारून मे.जमनाबेन अंबानी फाऊंडेशन यांना वाटप केले आहेत. सदर दोन्ही भूखंडासाठी 'सार्वजनिक सुविधा' ऐवजी 'शाळा' या जमीन वापर बदलास मान्यता प्राप्त झाल्यानंतर भाडेपट्टादारास दिनांक १२/०२/२००९ रोजी भाडेपट्टा विलेखाची प्रत देण्यात आली होती. तद्नंतर भाडेपट्टादाराने भाडेपट्टा विलेखातील अटी व शर्तीसंदर्भात मुद्दे उपस्थित केल्याने त्याचे निरसन करुन दिनांक ०५/०५/२०११ रोजी भाडेपट्टा विलेख निष्पादित केला व त्याच दिवशी सदर भूखंडाचा ताबा देण्यात आला. भाडेपट्टा विलेखातील कलम-२ (डी) मधील तरतूदींनुसार बांधकाम पूर्णत्वाचा ४ वर्षाचा कालावधी हा भाडेपट्टा विलेख साक्षांकित केल्याच्या दिनांकापासून गणण्यात येतो. त्यानुसार भाडेपट्टा विलेखाच्या निष्पादित दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०५/०५/२०११ ते ०४/०५/२०१५ हा कालावधी बांधकाम कालावधी गणण्यात येवून पुढील कालावधीकरीता देय झालेले दिनांक ४/०५/२०२० अखेरपर्यंतचे वाढीव बांधकाम कालावधीतील अतिरिक्त अधिमुल्याची व्याजासह रक्कम रुपये ३३.६१ कोटी भाडेपट्टेदाराने प्राधिकरणाकडे भरणा केली आहे.

(२) होय, वैधानिक लेखा परिक्षकांनी यासंदर्भात आक्षेप घेतला आहे. परंतु, भाडेपट्टा विलेखातील कलम-२ (डी) मधील तरतूदींनुसार भाडेपट्टा विलेखाच्या निष्पादित दिनांकापासून ४ वर्षाचा बांधकाम कालावधी वगळून पुढील वाढीव बांधकाम कालावधीसाठीच्या अधिमुल्य रकमेची भाडेपट्टादाराकडून व्याजासह वसुली करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद-जालना महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(९) * ७७८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद-जालना महामार्गाचे १० वर्षापुर्वी बीओटी तत्वावर चौपदरीकरण करण्यात आल्यामुळे सदर महामार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावरील टोल वसुली मध्ये वाढ करण्यात आली आहे मात्र, रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ होऊन गत वर्षात ३६ जणांचा अपघातात बळी गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) नाही.

सदर रस्त्याचे चौपदरीकरण झाल्यापासून वाहतुकीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. तथापि, माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान वाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) सदर रस्त्यावरील टोल वसुली निविदा शर्तीनुसार व शासन पथकर अधिसूचनेनुसार सुरू आहे. तसेच रस्त्याची दुरूस्ती व देखभाल निविदा अटी व शर्ती आणि आवश्यकतेनुसार सतत करण्यात येत असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. रस्त्याच्या दुरूस्ती अभावी अपघात झाल्याची विभागीय कार्यालयाकडे नोंद नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांना वर्ग खोल्या नसल्याबाबत

**(१०) * १४४ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाली असून सोई सुविधांचाही अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नारेगांव व मुकुंदवाडी महानगरपालिकेच्या शाळेला वर्ग खोल्या अपुऱ्या असल्याने विद्यार्थ्यांना दाटीवाटीने बसवले जात असून वर्ग ८ वी व १० वी च्या वर्गाकरीता शिक्षक उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेला पुरेशा वर्ग खोल्या व आवश्यक त्या सोयी सुविधासह शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या काही शाळांच्या इमारती जुन्या असून अनेक वर्षापासून वापरात आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

मात्र अशा इमारतींचे नुतनीकरण तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सोयी सुविधा देण्याचे प्रस्तावित असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नारेगांव येथे महानगरपालिकेच्या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या २२०० पेक्षा अधिक असल्यामुळे वर्गखोल्या कमी पडतात, ही वस्तुस्थिती आहे. मात्र त्या शाळेनजीकच्या इमारती महानगरपालिकेने भाड्याने घेतल्या असून, त्याठिकाणी वर्ग सुरु आहेत.

मुकुंदवाडी येथील शाळेत ६७५ विद्यार्थ्यांसाठी १३ वर्गखोल्या उपलब्ध असून शाळा दोन सत्रामध्ये कार्यरत असल्याने वर्ग खोल्या पुरेश्या आहेत.

तसेच नारेगांव व मुकुंदवाडी शाळेमध्ये शिक्षक संख्या पुरेशी असून वर्ग ८ वी ते १० वी च्या वर्गाला पुरेशे शिक्षक उपलब्ध आहेत, असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांना पुरेश्या वर्गखोल्या, त्याचप्रमाणे आवश्यक त्या सोयी सुविधा विविध योजनांतून देण्यात येत आहेत तसेच शिक्षकांची संख्या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेशी असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे ते मुलुंड दरम्यान नवे विस्तारीत स्थानक उभारण्याबाबत

**(११) * ८०२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे ते मुलुंड दरम्यान नवे विस्तारीत स्थानक उभारण्याबाबतचा आराखडा शासनामार्फत सादर करण्यात आला असून उक्त स्थानक उभारण्यासाठी आवश्यक असलेली मनोरूग्णालयाची १४.८३ एकर जमीन महापालिकेच्या ताब्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमीन हस्तांतर प्रक्रियेमुळे सदर स्थानकाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे ते मुलुंड दरम्यान नवे विस्तारीत स्थानकाचे काम पूर्णत्वास नेण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने केलेल्या शिफारसींबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेवरील विकास योजना प्रस्तावामध्ये फेरबदल करण्याचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेने शासनास सादर केला असता त्यास शासनाने दिनांक १८/२/२०२० च्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बोरीवली व कांदिवली येथील महानगरपालिकेचे रुग्णालय सर्व सोयी सुविधांनी अद्ययावत करण्याबाबत

**(१२) * ७०५ श्री.प्रविण दरेकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली येथील भगवती रुग्णालय अद्ययावत बनविण्यासाठी महापालिकेने सन २००६ मध्ये तयार केलेला प्रस्ताव सन २००९ मध्ये पारीत झाल्यानंतर सन २०१० मध्ये भूमिपुजन झालेले असतानाही माहे जून, २०१९ पर्यंत सदर योजनेच्या कामाचा पहिला टप्पा ही पूर्ण झालेला नसल्याने

स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे दिनांक १४ जून, २०१९ रोजी लेखी निवेदनाव्दारे उक्त रुग्णालय अद्ययावत करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात केवळ मेडिसीन विभाग कार्यरत असून १००० खाटांचे प्रस्तावित रुग्णालय प्रलंबित असल्याने शस्त्रक्रिया, प्रसुती आणि स्त्रीरोग, अस्थिभंग, बालरोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग अपघात अतिदक्षता विभागासह आपत्कालीन विभाग कार्यरत नसल्यामुळे पश्चिम उपनगरातील गोरगरीब रुग्णांना औषधौपचारासाठी केईएम, परेल किंवा नायर रुग्णालय, मुंबई सेंट्रल येथे जावे लागत असल्याने सदर रुग्णालय अद्ययावत करण्याच्यादृष्टीने कार्यवाही न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच कांदिवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयामार्फत गत काही वर्षापासून रुग्णांना रक्त तपासणीसह विविध चाचण्यांसाठी खाजगी लॅबकडे पाठविले जात असून संबंधित खाजगी लॅबचालकांकडून सर्वसामान्य रुग्णांची सर्रास लूट सुरु आहे तसेच एन्जिओग्रॅफी, एन्जिओप्लास्टी, वेन्टीलेटर कक्ष, अत्याधुनिक शस्त्रक्रिया, कार्डिओलॉजी, कार्डिओसर्जरी तसेच निओनॅटल कक्ष इत्यादी सेवा सुरु झालेल्या नसून विविध रोगांच्या निदान करणाऱ्या मशीनरी उपलब्ध असतानाही संबंधित तंत्रज्ञाची मंजूर पदे न भरल्यामुळे उपनगरातील रुग्णांना अन्य रुग्णालयात औषधौपचाराकरीता जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर दोन्ही रुग्णालयमार्फत रुग्णांना चांगल्या सोयी सुविधांचा लाभ मिळण्याकरीता विनाविलंब अद्ययावत यंत्रणा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१) याबाबतचे दिनांक १४/०६/२०१९ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) भगवती रुग्णालयाची संपूर्ण इमारत पाडून त्या जागेवर पहिल्या टप्प्यात नर्सिंग ट्रेनिंग सेंटर व दुसऱ्या टप्प्यात एक हजार खाटांचे अत्याधुनिक मुख्य रुग्णालय बांधण्याच्या प्रस्तावाला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १५/०४/२००९ रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती.

त्यानुसार पहिल्या टप्प्यातील नर्सिंग ट्रेनिंग सेंटरच्या इमारतीचे बांधकाम निविदा प्रक्रिया राबवून सन २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले.

तद्नंतर पूर्व व पश्चिम उपनगरातील महानगरपालिका रुग्णालयांच्या पुनर्विकास प्रकल्पांचा आढावा घेतल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये दुसऱ्या टप्प्यातील ३७८ सर्वसामान्य व सुपरस्पेशालिटी विभागाच्या ११२ रुग्णशय्यांची अशा एकूण ४९० रुग्णशय्या असलेले सुसज्ज व अद्ययावत रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

यामध्ये शस्त्रक्रिया, प्रसुती आणि स्त्रीरोग, अस्थिभंग, बालरोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग, अपघात अतिदक्षता विभागांसह आपत्कालीन विभाग व सुपरस्पेशालिटी विभाग अंतर्भूत आहेत.

भगवती रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात तळमजला + ११ मजल्यांच्या नर्सिंग ट्रेनिंग सेंटरच्या इमारतीमध्ये ११० रुग्णशय्येचा वैद्यकीय विभाग माहे जुलै, २०१६ पासून तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्यात आला आहे.

तसेच, दुसऱ्या टप्प्यात तळमजला + आठ मजली इमारतीमध्ये ४९० रुग्णशय्येचे अत्याधुनिक उच्चस्तरीय रुग्णालय अतिविशेष सेवांसह सुरु करण्यात येणार असून, सदर कामाचा कार्यादेश दिनांक ०१ ऑगस्ट, २०१९ रोजी देण्यात आला आहे. सदर कामाचा कालावधी ३ वर्षे इतका आहे.

कांदिवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय येथे प्रयोगशाळा विभाग २४ x ७ तीन पाळ्यांमध्ये कार्यरत असून, त्यामार्फत रुग्णांच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या मोफत केल्या जातात.

महानगरपालिका रुग्णालयांमध्ये उपलब्ध नसलेल्या विशिष्ट चाचण्या महानगरपालिकेत माहे जून, २०१९ पासून राबवित असलेल्या “आपली चिकित्सा” योजनेमार्फत मोफत करण्यात येतात.

सद्य:स्थितीत एन्जिओग्रॅफी, एन्जिओप्लास्टी, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया, कार्डिओलॉजी, कार्डिओसर्जरी, निओनॅटल या अतिविशेष विभागांच्या सेवा के.ई.एम., नायर, लोकमान्य टिळक (सायन) व कुपर या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहेत.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाच्या आवारात ३२५ रुग्णशय्येचे स्वतंत्र सुपरस्पेशालिटी रुग्णालय प्रस्तावित असून, त्याचे आराखडे मंजूर करण्यात आले आहेत व त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

सदर रुग्णालयात नेफ्रोलॉजी, गॅस्टोएन्टेरोलॉजी, गॅस्टोसर्जरी, कार्डीओलॉजी, कॅथलॅब, डायलिसिस विभाग, न्युरोलॉजी, हिमॅटोलॉजी, ऑंकोलॉजी, एन्डोक्रायनॉलॉजी, एन्डोस्कोपी, प्लास्टीक सर्जरी व रेडिओथेरपी विभाग अंतर्भूत आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाच्या आस्थापनेवर “प्रयोगशाळा तंत्रज्ञ” या संवर्गाची एकूण २६ पदे मंजूर असून, त्यापैकी ७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## मुंबईतील ५०० चौ. फुटांपर्यंतच्या घरांना आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कराबाबत

**(१३) * ९९ श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५६१ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महापालिकेने ५०० चौरस फुटांच्या घरात राहणाऱ्या रहिवाश्यांना मालमत्ता करात सवलत जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सवलत फक्त मालमत्ता करापुरती आहे की पाणी, मलनिःस्सारण, पथकर आदी विविध करावरही सवलत देण्यात आलेली आहे याबाबत सुस्पष्टता नसल्यामुळे ५०० चौरस फुटांची सदनिका असलेल्या इमारतीतील सुमारे २.२० लाख मालमत्ताधारकांना सन २०१९-२०२० या

वर्षातील मालमत्ता कराची देयके पाठविण्यात आलेली नसल्यामुळे मालमत्ता कराच्या वसुलीवर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मालमत्ता कराची देयके पाठविण्यात महानगरपालिका अपयशी ठरल्यामुळे अनेकांना मालमत्ता कर वेळेवर भरून उक्त सवलतीचा लाभ घेता आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ. फुटापर्यंतच्या सदनिकांना सर्वसाधारण कर माफ करण्याबाबतचे विधेयक मंजूर करण्यात आले आहे.

निवासी मालमत्ता कराच्या देयकामध्ये सर्वसाधारण कर, जलकर, जललाभ कर, मलनि:स्सारण कर, मलनि:स्सारण लाभ कर, मनपा शिक्षण उपकर, राज्य शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर, वृक्ष उपकर व पथकर या १० करांचा समावेश आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ४.१० लाख मालमत्तांपैकी ५०० चौ. फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या निवासी व अन्य सर्व अनिवासी अशा एकूण १.८३ लाख मालमत्तांना माहे मे, २०१९ मध्ये नियमित मालमत्ता कराची देयके वितरीत करण्यात आली आहेत.

तसेच, निवासी व अनिवासी असा संयुक्त वापर असलेल्या मालमत्तांमधील ५०० चौ. फुटापर्यंत क्षेत्रफळ असलेल्या निवासी सदनिका वगळून इतर सर्व निवासी व अनिवासी अशा एकूण ९०,५२० मालमत्तांना सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची देयके पाठविण्यात आली आहेत.

५०० चौरस फुट क्षेत्रफळाच्या निव्वळ निवासी सदनिका असलेल्या १.३७ लाख इतक्या मालमत्तांना सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची देयके पाठविण्यात आलेली नाहीत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

उर्वरित २.७३ लाख इतक्या मालमत्तांना मालमत्ता कराची देयके वितरीत करण्यात आली असून मालमत्ता कराच्या वसुलीवर परिणाम झालेला नाही. तसेच मालमत्ता कराचे विहित वेळेत अधिदान केलेल्या मालमत्ताधारकांना “अर्ली बर्ड” सवलतीचा लाभ मिळाला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महापालिकेत नव्याने समाविष्ट केलेल्या गावांमधील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१४) * १०७७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महापालिकेत नव्याने समाविष्ट केलेल्या २७ गावांमधील दिनांक १ जून, २०१५ पासून कार्यरत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेऊन कायम कर्मचाऱ्यांचे वेतन व सेवाशर्ती तात्काळ लागू करणे तसेच त्यांच्या इतर प्रलंबित प्रश्नांबाबत संबंधित कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त संघटनेने मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर कर्मचाऱ्याच्या मागण्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट केलेल्या २७ गावातील रोजंदारी तत्वावर/ठोक पगारावर कार्यरत कर्मचाऱ्यांची दिनांक २२/०९/२०१५ च्या आदेशान्वये केवळ तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली आहे.

तद्नंतर सदर कर्मचाऱ्यांना दर सहा महिन्यानंतर दोन दिवसाचा खंड देऊन वेळोवेळी त्यांना नव्याने नियुक्ती देण्यात आली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार तात्पुरत्या स्वरूपातील केलेल्या नेमणूका नियमित करता येत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

मुळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही, या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, दिनांक २५/०८/२००५ अन्वये सर्व पदावरील नियुक्त्या विहित मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी भागातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता मिळणेबाबत

**(१५) * १०१६ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वेतन आयोगानुसार वेतन देण्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर राज्य वेतन आयोग व शासनामार्फत पुरक आदेश निर्गमित करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी झाल्यानंतरही शासकीय कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देय करण्याबाबत सन २००२ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये आदिवासी भागातील विशेषत: माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्याचा आदेश निर्गमित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन भत्त्यांचा आदेश निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय.
(२) राज्यातील दुर्गम व मागासलेल्या आदिवासी भागांचा तसेच नक्षलग्रस्त अशा संवेदनशील भागांचा जलदगतीने विकास होण्याच्यादृष्टीने या बिकट क्षेत्रात शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तेथे कार्यरत असणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनात्मक सवलती देय करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०६/०८/२००२ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत या शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या तरतूदीच लागू आहेत,
(३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०६/०८/२००२ अन्वये अनुज्ञेय करण्यात आलेल्या सवलतींचा कालानुरुप आढावा घेवून त्यानुषंगाने शासनास शिफारस करण्याकरीता विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले होते. या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालाव्दारे करण्यात आलेल्या शिफारशींचा साधक बाधक विचार करुन राज्यातील आदिवासी / नक्षलग्रस्त भागात सेवारत असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय करावयाच्या सुधारीत सवलतींबाबत सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील झोपडीधारकांना संरक्षण देण्याबाबत

**(१६) * ६०९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती स्मिता वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रामदास कदम, श्री.निलय नाईक, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ६० टक्के झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेले अनेक रहिवासी गत २० ते २५ वर्षे झोपडपट्टीतील पहिल्या मजल्यावर वास्तव्यास असून वरच्या मजल्यावरील घराचे स्वतंत्र विद्युत बिल, मालमत्ता कराची पावती, पाण्याचे बिल, शिधावाटप पत्रिका आदी पुरावे उपलब्ध असून देखील एसआरए कायद्यामधील तरतुदीनसार पहिल्या मजल्यावरील झोपडीधारक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील सदनिकेस पात्र नसल्यामुळे अनेक झोपडीधारकांना बेघर व्हावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टीमधील वरच्या मजल्यावरील घरांना मान्यता देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा अधिनियम, १९७१ मधील तरतुदीस मान्यता देऊन पहिला माळा शासन धोरण, २०१७ प्रमाणे बेघर होणाऱ्या झोपडीधारकांना संरक्षण व न्याय देण्यात यावा अशी मागणी माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पू.) अधिनियम १९७१ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांमधील झोपडीच्या व्याख्येनुसार पहिल्या मजल्यावरील झोपडीधारक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील विनामोबदला पुनर्वसन सदनिकेस पात्र नाहीत.

दिनांक ११/०७/२००१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४(५) मधील तरतुदीनुसार पोटमाळा/पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना वेगळे स्वतंत्र ओळखपत्र (फोटोपास) देण्यात येणार नाही. अशा प्रकारे पोटमाळा/पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना असंरक्षित ठरविल्यामुळे मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ३०७५/२०१५, ५२८/२०१६ आणि २२३१/२०१६ दाखल करुन दिनांक ११/०७/२००१ च्या शासन निर्णयाला आव्हान देण्यात आले होते. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३/०६/२०१८ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार उक्त शासन निर्णयातील परिच्छेद ४(५) मधील तरतूद वैध ठरविली आहे.

(२) व (३) हे खरे आहे. तथापि, यापूर्वी मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने वरील वस्तुस्थिती मा.लोकप्रतिनिधींना कळविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबत

**(१७) * ४२९ श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विविध विभागांसाठी ५२९८ अतिरिक्त पदे निर्माण करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना फक्त ११ महिन्याकरीता नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकरा महिन्यानंतर देखील जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कोणत्या प्रकारची योजना शासनाने तयार केली वा करण्यात येणार आहे, तसेच अकरा महिन्यासाठी नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांना कोणत्या प्रकारचे शासकीय लाभ मिळणार आहे,

(४) असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र कर्मचाऱ्यांना मिळावे याकरीता शासनाने कोणत्या प्रकारची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या व त्यानंतर सदर जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे रिक्त करुन त्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचा निर्णय दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

(२) होय.

दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना ११ महिन्यासाठी अथवा ते सेवानिवृत्त होतील, यापैकी जे अगोदर घडेल, त्या दिनांकापर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

(३) अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवाविषयक/निवृत्तीवेतन विषयक लाभ मंजूर करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी अभ्यास गट स्थापन करण्यात येणार आहे.

(४) आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडून सेवा प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करण्याकरीता दिनांक १/१०/२०१९ पासून गती अभियान राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) येथे जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करणेबाबत

**(१८) * ६९१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथे वरिष्ठस्तर न्यायालय व जिल्हा सत्र न्यायालय स्थापन करावे अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनपेठ व मानवत दरम्यानचे मध्यवर्ती ठिकाण, राष्ट्रीय महामार्ग २२२ ला जोडलेले ठिकाण तसेच पाथरी येथे वरिष्ठस्तर न्यायालय व जिल्हा सत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे. श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, विधान परिषद सदस्य यांनी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२० रोजीचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांचेकडे सादर केले आहे.
(२) राज्यात न्यायालय स्थापन करण्याची शिफारस मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाल्यास शासनस्तरावर त्याबाबत निर्णय घेण्यात येतो. श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, विधान परिषद सदस्य यांचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजीचे निवेदन महाप्रबंधक मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शासन पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखलदरा (जि.अमरावती) पर्यटन स्थळाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) * ९४४ श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथे कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने विदर्भातील अत्यंत लोकप्रिय असलेल्या चिखलदरा येथे पर्यटकांची संख्या कमी होत असल्याने अमरावती चिखलदरा दोन्ही टेकड्यांना जोडण्याकरीता तसेच चिखलदरा येथे पर्यटनाचा विकास करण्याकरीता स्कायवॉकची निर्मिती होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखलदरा पर्यटन स्थळाला मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने शासनामार्फत १०० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निसर्गरम्य ठिकाणाचा विकास निधीअभावी प्रलंबित असल्याने पर्यटकांचे आकर्षण वाढविण्याच्यादृष्टीने तसेच शासनाच्या महसूलात वाढ होण्याकरीता,

चिखलदरा पर्यटन स्थळाला मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करण्याकरीता विशेष निधीची तरतुद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर काम केव्हापर्यंत पूर्णत्वास येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
चिखलदरा क्षेत्राच्या विकासाकरीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची नियुक्ती करण्यात आली असून चिखलदरा येथील गोराघाट पॉईंट ते हरिकेन पॉईंट दरम्यानच्या खालील दरीवर ०.५ कि.मी. लांबीचा स्काय वॉक सिडकोमार्फत विकसित करण्यात येत आहे.
(२) व (३) चिखलदरा पर्यटन स्थळाला मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने शासनामार्फत १०० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी निदर्शनास आलेली नाही.
तथापि, चिखलदरा येथील विविध पर्यटनस्थळांचे सुशोभिकरण तसेच पायाभुत सोयी सुविधांसह स्काय वॉक सिडकोमार्फत विकासित करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कुंभारवाडी परिसरात लक्ष्मी बिल्डिंग व बाजूच्या इतर इमारती धोकादायक झाल्याबाबत

**(२०) * ६०४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील डोंगरी दुर्घटनेनंतर कुंभारवाडी परिसरात दाटीवाटीने जीर्ण इमारती उभ्या असून त्यातील १०० वर्षे झालेली लक्ष्मी बिल्डिंग व बाजूच्या इतर इमारती अतिशय धोकादायक परिस्थितीत असल्याचे दिनांक २२ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींचा पुनर्विकास करण्यास विकासक मिळत नसल्याने त्या पुनर्विकासापासून वंचित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अहवालानुसार, मुंबई शहरातील महानगरपालिकेच्या ब, क व इ या विभागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारती या अतिशय अरुंद भुखंडावर एका लगत एक दाटीवाटीने बांधलेल्या आढळून येतात. कुंभारवाडा परिसरातील “लक्ष्मी बिल्डिंग” ही उपकरप्राप्त इमारतीची मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सहाव्या टप्प्यात दुरुस्ती करण्यात आली असून, इमारतीच्या शौचालयाचा भाग तसेच खोल्यामधील छताच्या दुरुस्तीचे काम करुन संरचनात्मकदृष्टीने सुरक्षित करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित कामाकरीता भाडेकरु/रहिवाशी यांनी स्थानिक आमदार निधीतून निधीची मागणी केली आहे. सदर निधी प्राप्त होताच उर्वरित कामे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत हाती घेण्यात येतील.
(२) कुंभारवाडी परिसरातील लक्ष्मी बिल्डिंग व बाजुच्या इतर इमारतीचा पुनर्विकासाचा प्रस्ताव विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये मालक/ विकासक व किमान ५१ टक्के भाडेकरु/रहिवाशी यांच्याकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. तथापि, याबाबतचा पुनर्विकासाचा प्रस्ताव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील जुन्या इमारतींवर कायमस्वरूपी वेदरशेड उभारण्याबाबत

**(२१) * १४३७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील जुन्या इमारतींवर कायमस्वरूपी वेदरशेड उभारण्यास परवानगी देणारा ठराव ठाणे महानगरपालिकेने पारीत करून त्यास मंजुरी मिळण्यासाठी नगरविकास विभागाकडे पाठविला असून त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच सदर प्रस्ताव निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम २३(३) मध्ये फेरबदल करण्याचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेने शासनास दिनांक २१/७/२०१४ च्या पत्रान्वये मान्यतेकरीता सादर केला आहे. मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपलिकेचे सिडकोचे क्षेत्र वगळून उर्वरित महानगरपालिका क्षेत्राकरीता एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली लागु करण्याचा तत्वत: निर्णय शासनाने घेऊन, प्रारुप नियमावली आम जनतेकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी दिनांक २८/२/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. सदरची प्रारुप नियमावली अंतिम करताना ठाणे महानगरपालिकेच्या उक्त प्रस्तावावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्री संत साईबाबा यांच्या जन्मस्थळावरुन वाद निर्माण झाल्याबाबत

**(२२) * १५१० श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील साईबाबांच्या जन्मभूमी विकास आराखड्यास शासनाने रुपये १०० कोटींचा निधी दिल्यामुळे साईबाबांच्या जन्मस्थळावरून पाथरी आणि शिर्डी ग्रामस्थामध्ये वाद सुरु झाला असून दिनांक १९ जानेवारी, २०२० पासून शिर्डी बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर वाद शासनस्तरावर मिटविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

साईबाबांच्या जन्मस्थळावरुन दिनांक १९/०१/२०२० पासून शिर्डी बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला होता. तथापि, सदर बंद दिनांक १९/१/२०२० च्या रात्री १२.०० वा. पासून मागे घेण्यात आला.

शासनामार्फत साईबाबांच्या जन्मभूमी आराखड्यासाठी रुपये १०० कोटी निधी देण्यात आलेला नाही.

(२) मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक २०/०१/२०२० रोजी शिर्डी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करुन सदर वाद सामोपचाराने मिटविण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील महापालिकेच्या अंगणवाडीतील सेविकांना मासिक वेतन मिळत नसल्याबाबत

**(२३) * १५३६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महापालिकेच्या अंगणवाडीतील सेविकांना गत सात महिन्यांचे मानधन मिळाले नसून सुमारे २८० अंगणवाडी सेविकांना विनावेतन काम करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन न मिळाल्यामुळे अंगणवाडी सेविकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) "अंगणवाडी सेविका सात महिने पगाराविना" अशा आशयाची बातमी दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ई-निविदांव्दारे नियुक्त स्वयंसेवी संस्थांमार्फत महानगरपालिका शाळांमध्ये बालवाडी वर्ग चालविले जातात.

सद्य:स्थितीत शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये एकूण ८४८ बालवर्ग सुरु आहेत. सदर बालवाडी वर्गासाठी २६ स्वयंसेवी संस्थांमार्फत ८४८ सेविका व ८४८ मदतनीसांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर ८४८ बालवाडी वर्गांपैकी १४२ बालवाडी वर्ग विद्यार्थी पटसंख्येअभावी आवश्यकतेनुसार इतर महानगरपालिका शाळांमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहेत.

सदर १४२ बालवाडी वर्गांमध्ये नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या सेविका व मदतनीसांची माहिती संबंधित स्वयंसेवी संस्थांमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे त्यांना माहे जून, २०१९ पासूनचे मानधन देण्यात आले नाही.

तथापि, १४२ बालवाडी वर्गांपैकी ७१ बालवाडी वर्गांची माहिती संबंधित स्वयंसेवी संस्थांमार्फत डिसेंबर, २०१९ मध्ये प्राप्त झाल्यानंतर माहे जानेवारी, २०२० पर्यंतचे मानधन त्यांना अदा करण्यात आले आहे.

उर्वरित ७१ बालवाडी वर्गांची माहिती माहे जानेवारी, २०२० मध्ये प्राप्त झाली असून त्यांचे मानधन देण्याबाबतची कार्यवाही माहे मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

----------------

## राज्यात नागरिकांना आधारकार्ड वेळेत मिळण्याबाबत

**(२४) * १८२२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००९ मध्ये वा त्यादरम्यान आधार नोंदणी सुरू झाली असून त्यावेळी खाजगी व्यक्तींव्दारे उपलब्ध असलेल्या केंद्रांमुळे नागरिकांना आधार कार्डसाठी नोंदणी करणे, अद्ययावत करणे, बदल करणे शक्य होत असून आधार कार्डही वेळेवर मिळत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र गत काही कालावधीपासून खाजगी व्यक्तींव्दारे चालविण्यात येणारी आधार केंद्रे बंद करण्यात आली असून बँका, पोस्ट कार्यालयामार्फत आधार केंद्र सुरू करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नविन ठिकाणी आधार कार्ड नोंदणी करणे, आधार कार्डमध्ये पत्ता, नाव, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आदी माहिती बदलण्याकरीता नागरिकांना अनेकवेळा हेलपाटे मारावे लागत असून आधार कार्ड नोंदणी तसेच आवश्यक बदल करूनही काही नागरिकांना आधार कार्ड प्राप्त न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागरिकांना आधार कार्ड त्वरित मिळण्याबाबत कोणती उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) हे खरे नाही. सदर योजनेची सुरूवात राष्ट्रीय पातळीवर सप्टेंबर, २०१० पासून झालेली आहे.

(२) बँका आणि पोस्ट कार्यालयामार्फत सुरू करण्यात आलेली आधार केंद्रे भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण, भारत सरकार यांच्याकडून सुरू करण्यात आली आहेत. तथापि, खाजगी जागेमधील आधार केंद्रे शासकीय जागेत स्थलांतरीत करण्याबाबतचे केंद्र शासनाचे निदेश आहेत.

(३) हे खरे नाही. बँका व पोस्ट कार्यालयातील आधार केंद्रे ही, आधार केंद्र भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण (युआयडीएआय), भारत सरकार यांच्या अखत्यारीतील असल्यामुळे त्याबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त होत नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माझगांव (मुंबई) येथील तुळशीदास गोपालजी चॅरिटेबल आणि ढकलेश्वर मंदिर ट्रस्टच्या विश्वस्तांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(२५) * २२६९ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५९५ ला दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) येथील तुळशीदास गोपालजी चॅरिटेबल आणि ढाकलेश्वर मंदिर ट्रस्टच्या विश्वस्तांनी गैरव्यवहार केल्याबाबत रहिवाशांच्या तक्रारीनुसार दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी निरीक्षक अहवाल सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात धर्मादाय उपायुक्त यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घ्यावे असा आदेश दिला असून सदर तक्रारदारांचा जबाब प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर प्रकरणी तक्रारदारांचे जबाब नोंदवून संबंधित ट्रस्टच्या विश्वस्तांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी तत्कालीन धर्मादाय उपआयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशानुसार तक्रारदारास त्यांचे म्हणणे सादर करणेकरीता बृहन्मुंबई कार्यालयाकडून विनंती पत्र पाठविण्यात आले आहे.

(३) व (४) तक्रारदाराने केलेल्या तक्रारीतील विनंती ही, अर्जदार श्री.भोगीलाल रांभिया यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६(२) अन्वये केलेल्या अर्जान्वये, न्यासाने विकासकास विक्री केलेल्या जागेचा करार हा रद्द करुन सदर जागा संस्थेस प्रत्यार्पित करावी व ट्रस्टींने केलेला गैरव्यवहार व भ्रष्टाचाराची चौकशी करुन न्याय द्यावा ही होती.

श्री.भोगीलाल रांभिया यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६(२) अंतर्गत अर्ज क्रमांक ०५/२०१० दाखल केला. त्यानंतर अर्जदार यांनी कलम ३६(२) अंतर्गतचा अर्ज मागे घेणेकरीता अर्ज केला. सदरहू मागे घेणेकरीताचा अर्ज धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक ०९/०८/२०१९ रोजीच्या आदेशाने मंजूर केला आहे.

तसेच श्री.राजेश छेडा यांनी ट्रस्टच्या विश्वस्तांविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६(२) अंतर्गत अर्ज क्रमांक ४५/२०१७ दाखल केला असून सदरचा अर्ज सद्य:स्थितीत प्रलंबित आहे. सदरचे प्रकरण धर्मादाय आयुक्त यांचे कोर्टात सुरु आहे.

-----------------

## मौजे नायगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(२६) * २३१८ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नायगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे क्र.१९, हिस्सा क्र.११ येथील घराच्या वहिवाटीच्या रस्त्यात सर्वश्री भरत हरिश्चंद्र गौरीकर व निवृत्ती यशवंत घुसेकर यांनी अनधिकृतपणे भिंतीचे बांधकाम करुन वडिलोपार्जित वहिवाटीचा रस्ता बंद केल्याबाबत दिनांक २३ मार्च, २०१८, २९ जून, २०१८, ६ ऑगस्ट, २०१८ व १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी तक्रारी करुनही न्याय मिळत नसल्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास विभाग (१), जिल्हाधिकारी, पालघर आणि आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडे अर्ज दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम, १९४९ मधील नियमानुसार उचित कारवाई करण्याचे निदेश आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी दिले असतानाही अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय कामात दिरंगाई करणाऱ्या दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन सार्वजनिक रस्ता मोकळा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) व (३) मौजे नायगाव, सजा वडवली, स.क्र.१९/७ मधील अनधिकृत बांधकामाबाबत आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार उचित कार्यवाही करण्याच्या सूचना प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी वसई-विरार शहर महानगरपालिका यांना दिनांक १०/०९/२०१५ रोजी दिल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

दरम्यान, सदर वहिवाटीची हद्द निश्चित करणे व जागेची मोजणी व सिमाकंन करण्याच्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. सदरचे अनधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदी अन्वये चार आठवड्यात कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सूचित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शालेय पोषण आहार निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) * २३३६ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारात निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असून ऑनलाईन पध्दतीने २३ संस्थांनी निविदा अर्ज भरले असता त्यापैकी प्राप्त गुणाच्या आधारे १३ संस्थांना मध्यान्ह भोजनाची निविदा देवून सुमारे रुपये २० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली येथील एकभूमी चॅरिटेबल फाऊंडेशनच्यावतीने ॲड. सुवर्णा पावशे यांनी गैरव्यवहाराप्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला नोटीस बजावली असून सदर गैरव्यवहाराची विनाविलंब चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरवठा करण्याकरीता दिनांक ७/०५/२०१९ रोजी ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात आली होती.

त्यास अनुसरून एकूण २३ संस्था/महिला महामंडळाकडून अर्ज प्राप्त झाले.

प्राप्त झालेल्या अर्जांचे गुणांकन तक्त्यानुसार गुणांकन करून आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ५/०८/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सर्वानुमते १२ संस्थांची निवड करण्यात आलेली आहे.

उर्वरित संस्था आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करू न शकल्याने त्यांची निवड करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) ॲड. सुवर्णा पावशे यांची दिनांक १५/०१/२०२० च्या पत्रान्वये अशा आशयाची तक्रार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सर्वसाधारण सभेत चर्चा झाली असता, यासंदर्भात “चौकशी करून अहवाल सादर करा” असे महापौरांनी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकास्तरावर चौकशी सुरू असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील जवाहरनगर येथील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(२८) * २३७० डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील जवाहरनगर येथील ६२३ ए ४ हा प्रस्तावित डीपी रोड असून सदर ठिकाणच्या चार गुंठे जागेवर सात ते आठ जणांनी अतिक्रमण करून घरे बांधली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांचेकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जवाहरनगर (कोल्हापूर) येथील डीपी रस्त्यावरील अतिक्रमणावर कार्यवाही करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील जवाहरनगर येथील स.नं. ६२३ ए ४ या जागेवर मुळ मालकाने गुंठेवारीमध्ये प्लॉट पाडून प्रस्तावित रस्त्याची जागा विक्री केल्याचे व सदर जागेवर नवीन मिळकतधारकांनी बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) उक्त निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. तथापि, अशा आशयाचे स्थानिक नगरसेवकाचे निवेदन यापुर्वी कोल्हापूर महानगरपालिकेस प्राप्त झाले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रस्तावित रस्त्याचे आरक्षण हे खाजगी जमिनीवर असून, सदर जमीन सद्य:स्थितीत कोल्हापूर महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. तसेच, यासंदर्भात दिवाणी न्यायालय, कोल्हापूर येथे दावा दाखल असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे येथील किल्ल्याच्या सुशोभिकरणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२९) * २३९४ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे येथील किल्ल्याच्या सुशोभिकरणाचे सुमारे रुपये २० कोटी काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मे.ए.पी.आय सिव्हिलकॉन या कंत्राटदार कंपनीस दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सदर कंपनीस बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या रस्ते दुरूस्ती, जलवाहिन्यांचे रंगकाम, रस्त्याच्याकडेला बॅरिकेडस लावणे इत्यादी कामांमध्ये गैरव्यवहार केल्याप्रकरणी दंड आकारण्यात येवून केलेल्या कामाची चौकशी करण्याबाबत श्री.शकील पाटणी, सामाजिक कार्यकर्ता यांनी मा.नगरविकास मंत्री तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तक्रार अर्ज सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एखाद्या प्रकरणात दोषी आढळलेल्या कंत्राटदार कंपनीस काम देण्यात येवून नये असा बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनाचा नियम असताना देखील सदर कंत्राटदाराचा आर्थिक फायदा करण्याच्या दृष्टीकोनातून वांद्रे येथील किल्ल्याच्या दुरूस्तीच्या कामाचे कंत्राट देण्यात आले असून कंपनीच्या पूर्वीच्या दोषारोपांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उपरोक्त प्रकरणी सादर करण्यात आलेल्या तक्रार अर्जावर तसेच दोषी कंत्राटदारास काळया यादीत समाविष्ट करून कंपनीचे संचालक मंडळावरील सर्व सदस्यांचे पॅनकार्ड काळया यादीत टाकून भविष्यात सदर कंपनीस बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच शासनाकडून कोणतेही कंत्राट देण्यात येवू नये याकरीता कोणत्या उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) या आशयाची बातमी दिनांक १०/०२/२०२० रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) याबाबतचा दिनांक ०४/०२/२०२० रोजीचा तक्रार अर्ज प्राप्त झाला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) जलवाहिन्यांचे रंगकाम व रस्ते दुरुस्तीच्या कामांमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे मे.ए.पी.आय. सिव्हीलकॉन प्रा.लि. या कंपनीवर महानगरपालिकेमार्फत यापूर्वी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

वांद्रे किल्ल्याच्या परिसरातील उद्यानांचे सुशोभिकरण करण्याच्या कामाच्या निविदा प्रक्रियेत मे.ए.पी.आय. यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लघुत्तम प्रतिसादात्मक निविदाकारक म्हणून निवड करण्यात आली होती.

तथापि, सदर प्रस्ताव महानगरपालिकेच्या स्थायी समितीने दफ्तरी दाखल केल्यामुळे या कामाकरीता कार्यादेश देण्यात आले नाहीत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी नियुक्त कंत्राटदारांनी केलेल्या कामांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्यांच्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार नोटीसची बजावणी करुन दंडात्मक कारवाई करण्यात येते.

तथापि, कंत्राटदाराने त्रुटींची पुर्तता न केल्यास किंवा गैरव्यवहार केल्यास त्याला काळ्या यादीत टाकण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पवई (मुंबई) येथील हिरानंदानी भागातील गॅलेरिया मॉल मधील अनधिकृत अतिक्रमणाबाबत

**(३०) * २४९५ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई येथील हिरानंदानी भागातील “गॅलेरिया मॉल” मध्ये विविध प्रकारची दुकाने उघडण्यात आली असून सदर दुकानदारांनी महापालिकेची परवानगी न घेता आपली दुकाने पुढे वाढविल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुकाने पुढे वाढविण्यात आल्यामुळे मॉलमध्ये येणाऱ्या नागरिकांना ये-जा करण्यास रस्ता/जागा अरुंद पडत असून तेथे हॉटेल, खाद्यपदार्थ बनविण्याची दुकानेसुध्दा उघडण्यात आली असल्याने सदर खाद्यपदार्थ बनविणाऱ्या दुकानदारांनी महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून रितसर परवानगी घेतली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुकानदार विजेवर चालणाऱ्या यंत्राव्दारे डोसा, इडली आदि खाद्यपदार्थ सर्रासपणे तयार करुन विकत असून एकापेक्षा जास्त गॅस सिलेंडर दुकानात ठेवल्याने भविष्यात दुर्घटना होवून मोठी जिवितहानी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मॉलमध्ये सुरु असलेल्या अनधिकृत अतिक्रमणाबाबत महापालिकेकडे तक्रारी करुनही कोणतीच कारवाई झालेली नसल्यामुळे याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून गॅलेरिया शॉपिंग कॉम्प्लेक्समधील अतिक्रमण केलेल्या दुकानदारांवर तसेच रितसर परवाना न घेता सुरु असलेल्या हॉटेल तसेच खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील पवई येथील हिरानंदानी येथे “गॅलेरिया मॉल” या इमारतीचा काही भाग हा तळघर + तळमजला + पहिला मजला असा असून तळमजला व पहिल्या मजल्यावर दुकानांचे गाळे आहेत. तसेच, काही भाग हा तळमजला + पाच मजले असा असून तेथे व्यावसायिक कार्यालये आहेत.

गॅलेरिया मॉलमध्ये दुकाने वाढविणे व अतिक्रमण करुन हॉटेल सुरु करणे, खाद्यपदार्थ बनवून ते उघडपणे विकणे, एकापेक्षा जास्त सिलेंडर वापरणे अशा आशयाची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस माहे जानेवारी, २०२० च्या दरम्यान प्राप्त झाली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) गॅलेरिया मॉलमधील तळमजल्यावर खाद्यपदार्थ बनविण्याची ३ व पहिल्या मजल्यावर १५ दुकाने असून, तळमजल्यावरील २ दुकाने तात्पुरत्या स्वरुपाची लाकडी किंवा टेबल ठेवून वाढविण्यात आल्याचे आढळून आले.

तसेच, खाद्यपदार्थ बनविणाऱ्या सदर १८ दुकानांमध्ये एकापेक्षा जास्त गॅस सिलेंडर आढळून आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे :-

- तळमजल्यावरील ३ दुकानांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४/४७१ व ४७२ नुसार कारवाई करण्यात आली आहे.
- पहिल्या मजल्यावरील १५ दुकानांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ आणि ४७१ नुसार कारवाई करण्यात आली आहे.
- सदर १८ दुकानांमधून अद्यापपर्यंत एकूण ३१ गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.
- सदर १८ दुकानांवर पाहणी अहवाल बजावून शिंदेवाडी, दादर येथील मा.महानगर दंडाधिकारी न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.
- इतर ८ दुकानांमधील पोटमाळ्यांमध्ये करण्यात आलेल्या वाढीव बांधकामांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५१ नुसार नोटीस बजावण्यात आली आहे.
- सदर परिसर निरीक्षणाखाली ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग व मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील धूपप्रतिबंधक बंधारे नादुरुस्त असल्याबाबत

**(३१) * ४६० श्री.रमेशदादा पाटील, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४७९९७ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीतील समुद्र किनारपट्टी, मांडवा ते मिळकतखार, रेवस ते बोडणी तसेच सासवणे समुद्रकिनारा या भागातील बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर धुप होवून तो नादुरूस्त असून बोरली (ता.मुरुड) कोळीवाडा येथील समुद्रकिनारी असलेला धूप प्रतिबंधक बंधारा गत सहा-सात वर्षापासून समुद्राला येणाऱ्या उच्चतम व मोठ्या लाटांमुळे वाहून गेल्याने किनारपट्टीलगत असणाऱ्या घरांचे नुकसान होऊन लोक बेघर होण्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक मच्छीमार कोळी बांधवांनी तहसिलदार मुरुड (जि.रायगड) तसेच बोरली गावचे मंडळ अधिकारी व तलाठी यांना लेखी तक्रार दिल्यानंतर त्याठिकाणी समक्ष भेट देऊन नुकसान झाल्याचा पंचनामा करून शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीआरझेडच्या नियमातून कोळीवाड्यांना सूट देण्यात आली असली तरी दुरवस्था झालेल्या बंधाऱ्यांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यास सीआरझेडचा अडथळा निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अलिबाग व मुरुड येथील समुद्र किनाऱ्यालगत असलेले कोळीवाडे व गावाच्या संरक्षणाकरीता धूपप्रतिबंधक बंधाऱ्याची बांधणी करून मच्छिमार समाजातील लोकांना भविष्यात उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण देण्याबाबत तसेच नादुरूस्त सागरी धुपप्रतिबंधक बंधारे त्वरित बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) CRZ अधिसूचना २०११ नुसार नियमाप्रमाणे “महाराष्ट्र किनारी व्यवस्थापन प्राधिकरण” (MCZMA) व “राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन समिती” (SEIAA) ची परवानगी घेणे आवश्यक आहे.

(४) अलिबाग व मुरुड (जि.रायगड) येथील प्रस्तावित समुद्र धुपप्रतिबंधक बंधारे बांधण्याची कामे सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जुन्या पुनर्रचित इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३२) * १४१९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये म्हाडाच्या ५६ वसाहती असून त्यातील बहुसंख्य इमारती ६०-७० वर्षापूर्वीच्या असल्यामुळे सुमारे ४५ वर्षापूर्वीच्या ३३६ जुन्या इमारती, चाळी पाडून बांधण्यात आलेल्या मुंबईतील पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकास धोरणामध्ये माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान बदल करुन केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने सदर इमारतींची पुनर्विकास प्रक्रिया थांबली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती धोकादायक स्थितीत असून त्या कोसळल्यास होणाऱ्या अपघातांमध्ये जिवितहानी होण्याचा धोका निर्माण झाल्यामुळे या वसाहतींचा पुनर्विकास करण्याची गरज असून जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त आणि खाजगी इमारती, बीआयटी चाळी, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत येणाऱ्या इमारती तसेच म्हाडांतर्गत येणाऱ्या जुन्या चाळी आदींच्या पुनर्विकासाला गती मिळण्याकरीता शासनाने नेमलेल्या लोकप्रतिनिधींच्या आठ सदस्यांच्या समितीने माहे ऑगस्ट, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात गृहनिर्माण विभागास अहवाल सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारतींचा पुनर्विकास धोरणामध्ये बदल करुन त्यांचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचप्रमाणे गृहनिर्माण विभागास सादर करण्यात आलेल्या अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील ५६ वसाहतींमधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३ (५) नुसार करण्यात येत आहे. तर, मुंबई शहरातील जीर्ण व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींच्या जलद पुनर्विकासासाठी शासनाने दिनांक ११/०९/२०१९ रोजी मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारती/बिगर उपकरप्राप्त इमारती आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाशी संबंधित इमारतींशी निगडीत समस्यांसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनास सूचना करण्याकरीता शासन निर्णय, दिनांक २९/१०/२०१६ अन्वये ८ विधानमंडळ सदस्यांची समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारसी शासनास प्राप्त झाल्या आहेत.

(३) शासन निर्णय, दिनांक २९/१०/२०१६ अन्वये गठित करण्यात आलेल्या विधानमंडळ सदस्यांच्या समितीने सादर केलेल्या शिफारसींच्या अहवालानुसार मा.मंत्रिमंडळ दिनांक २८/०८/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

- मुंबई शहरातील जीर्ण व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या जलद पुनर्विकासासाठी शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दिनांक ११/०९/२०१९ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

- म्हाडा अधिनियम, १९७६ मधील कलम ७७ (C) आणि ९५-अ मध्ये सुधारणा करणे तसेच ७९-अ आणि ९१-अ या नवीन कलमांचा समावेश करण्यात येत आहे.
- उपकरप्राप्त व त्यालगत असणाऱ्या बिगर उपकरप्राप्त इमारतींचा समुह पुनर्विकास करण्यासाठी DCPR-२०३४ मध्ये सुधारणा करणे / मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये पुनर्विकास करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना नियोजन प्राधिकारी म्हणून घोषित करणे / ज्या उपकरप्राप्त इमारती म्हाडामार्फत पुनर्विकसित करण्यात आल्या आहेत, अशा ३० वर्ष जुन्या व मोडकळीस आलेल्या पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकास विकास नियंत्रण नियमातील ३३(७) नुसार करण्याच्या अनुषंगाने आवश्यकत्या सुधारणा करण्याबाबत नगरविकास विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी-कल्याण-शिळ टप्पा क्र. २ च्या कामास मंजुरी मिळण्याबाबत

**(३३) * १११ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४४५२८ ला दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-कल्याण-शिळ रस्त्याच्या टप्पा क्र. १ च्या कामात शिळफाटा ते भिवंडी या २१.६० कि.मी. रस्त्याचे चौपदरीकरण व मजबुतीकरण, देसाई खाडीवरील पूल व काटई रेल्वे पूल प्रस्तावित असून भिवंडी-कल्याण-शिळ मार्गाच्या टप्पा क्र. २ मध्ये कल्याण बाह्य वळण रस्ता व त्यावरील उड्डाण पुलासह उल्हास खाडीवरील मोठा पूल, त्यांचे जोडरस्ते व भिवंडी बाह्य रस्त्यावरील उड्डाणपूल बांधणे या कामाचा समावेश होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टप्पा क्र. २ च्या कामास प्रदीर्घ कालावधी लागणार असल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अखत्यारीतील दुर्गाडी जकात नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पत्री पूल ते टाटा पॉईंट या रस्त्याचे चौपदरीकरण व सुधारणा करुन त्यावरून ट्राफिक वळविणेबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा क्र. १०, दिनांक २० मार्च, २००६ रोजी विषय क्र. ९ ठराव क्र. १७२ नुसार ठराव करून शासनास "ना-हरकत दाखला" दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ठराव करून दिल्यानंतर एम.एस.आर.डी.सी.ने ज्या कारणासाठी हा "ना-हरकत दाखला" मागितला होता त्या भिवंडी-कल्याण-शिळ टप्पा क्र. २ चे काम वगळण्यासाठी प्रस्तावित असून मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दिनांक १३ जून, २०१७ रोजीच्या बैठकीत चर्चा होऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी भिवंडी-कल्याण-शिळ टप्पा क्र. २ हा अतिशय महत्वपूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकल्प वगळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र शासनाने भिवंडी कल्याण शिळफाटा रस्त्याची सुधारणा करणे या कामास शासन निर्णय, क्र.खाक्षेस-२००४/प्र.क्र.३२५/रस्ते-८, मंत्रालय मुंबई-३२, दिनांक २४/०७/२००६ नुसार मान्यता दिली असून टप्पा-२ च्या कामाची किंमत रुपये १००.९९६ कोटी आहे व या अंतर्गत कल्याण बाहय वळण रस्ता व त्यावरील रेल्वे उड्डाणपूलासह उल्हास खाडीवरील मोठा पूल, त्यांचे जोड रस्ते व भिवंडी बाहय वळण रस्त्यांवरील उड्डाण पूल या कामांचा समावेश आहे.

टप्पा-२ प्रकल्पासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील भूसंपादन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने करावयाचे असून तसेच कोनगाव ग्रामपंचायत क्षेत्रातील भूसंपादन सा.बां.विभागाने करावयाचे आहे व भूसंपादनासाठी लागणारा निधी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागास द्यावयाचा आहे. त्यानुषंगाने महामंडळाने या भूसंपादनासाठीची आतापर्यंत आवश्यक रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केली आहे. कोनगावात प्रत्यक्ष जागेवर केलेली आखणी दोनदा गावकऱ्यांनी काढून टाकली व सदर आखणीस गावकऱ्यांचा विरोध आहे. त्यामुळे कोनगाव ग्रामपंचायत क्षेत्रातील भूसंपादनाबाबत पुढील कार्यवाही झालेली नाही.

दरम्यान कल्याण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उल्हास खाडीवर मोठा पूल, माणकोली मोटागाव उल्हास खाडीवर सहापदरी पुल तसेच भिवंडी कल्याण शिळफाटा रस्त्यावरील बदलापूर जंक्शन पासून कल्याण रिंग रोड दूर्गाडी पुलापर्यंत बांधण्याची कामे हाती घेतली असल्यामुळे महामंडळाने टप्पा-२ ची कामे रद्द करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.

भिवंडी कल्याण शिळफाटा रस्त्यावर वाहतूक वर्दळमध्ये वाढ झाल्यामुळे शिळफाटा ते भिवंडी जंक्शन या २१.१०० कि.मी. लांबीमध्ये चारपदरी रस्त्याचे सहापदरीकरण (देसाई खाडीवरील दोन पुल, लोढा जंक्शन येथे उड्डाणपुल, कटई येथे दोन उड्डाणपुल व पत्रीपुलाचे येथे नवीन पुलासह) करण्याच्या प्रस्तावास शासनाने दिनांक २४/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली असून सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(३४) * १३२९ श्री.विलास पोतनीस, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.संजय दौंड : तारांकित प्रश्न क्रमांक ४८१३४ ला दिनांक २६ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर, मुंबई येथील महापौर निवासाच्या जागी स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला असून त्यासाठी रुपये १०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारक उभारणीची नियोजित जागा अपूरी पडत असल्याने नियोजित जागेऐवजी आता डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी चौकातील वाहतूक बेट येथे उक्त स्मारक उभारण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिली असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारक उभारणीसाठी समिती देखील नियुक्त करण्यात आली असून स्मारक उभारण्याची जबाबदारी एम.एम.आर.डी.ए.कडे देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त स्मारक उभारणीच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच स्मारक उभारणीसाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

दादर येथील महापौर निवासस्थानाच्या जागी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी लागणारा रुपये १०० कोटींचा निधी सुरुवातीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने खर्च करावयाचा असून, त्याची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

दक्षिण मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय आणि नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट इमारतीसमोर महात्मा गांधी रोडवरील डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी चौकातील वाहतूक बेटामध्ये शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या प्रस्तावास बृहन्मुंबई महानगरपालिकेने ठराव क्र. १४०१ अन्वये दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी मंजूरी दिली आहे.

(३) होय, खरे आहे.

(४) व (५) दादर येथील महापौर निवासस्थानाच्या जागी स्वर्गिय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिनांक २४ फेब्रुवारी, २०१९ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या एकूण दोन निविदांपैकी लघुत्तम निविदा ५४.५० टक्के अधिक्य दराची असल्याने सदरची निविदा स्वीकाराहर्य नसल्याने निविदा रद्द करण्यात आली आहे. यासंदर्भात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक सार्वजनिक न्यास यांच्या सल्ल्याने पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

-----------------

## विरार पश्चिम (जि.पालघर) येथील विरार-बोळींज म्हाडा वसाहतीला पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३५) * १४६१ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार पश्चिम (जि.पालघर) येथील विरार-बोळींज म्हाडा वसाहतीला पाणीपुरवठा होण्यासाठी वसई-विरार महानगरपालिकेकडून पाईपलाईन टाकण्याचे काम गत दीड वर्षापासून प्रलंबित असल्याने तेथील रहिवाश्यांना दररोज टँकरव्दारे पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक रहिवाश्यांनी तत्कालीन मा.गृहनिर्माण राज्यमंत्री, सभापती, कोकण गृहनिर्माण मंडळ, आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका तसेच वसई-विरार महापालिकेतील अधिकारी व गृहनिर्माण मंडळाचे संबंधित अधिकारी यांचेसमवेत झालेल्या बैठकीमध्ये महापालिकेने पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण करावे असे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सविस्तर निवेदन देखील देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पाईपलाईन टाकण्याचे काम विनाविलंब पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१) विरार-पश्चिम (जि.पालघर) येथील विरार बोळींज म्हाडा वसाहतीला म्हाडाव्दारे टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) होय.

तत्कालीन मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी दिनांक २१/०६/२०१९ रोजी घेतलेल्या बैठकीत म्हाडा विरार बोळींज प्रकल्पाच्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेने कायद्यानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी असे आदेश दिले होते.

(३), (४) व (५) म्हाडा रहिवाशांची पाणी पुरवठ्याच्या समस्येसंदर्भात निवेदने प्राप्त झाली असून यानुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

सदर वसाहतींना पाणीपुरवठा करण्याबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कळविले आहे :-

- चंदनसार मुख्य संतुलन टाकी ते बोळींजपर्यंत जलवाहिनी अंथरण्याचे काम हाती घेतले असून सदरचे काम प्रगती पथावर आहे.

- तथापि, संपूर्ण कामांपैकी ६०० मी. जलवाहिनी ही रेल्वे क्रॉसिंग खालून व स्थानिक शेतकऱ्यांच्या खाजगी शेतजमिनीतून जात असल्याने त्यानुषंगाने रेल्वे प्रशासनासोबत करारनामा अंतिम टप्प्यावर आहे.
- तसेच स्थानिक शेतकऱ्यांसमवेत याबाबत वाटा-घाटी करून तोडगा काढणे सुरु आहे.

-----------------

## राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांमधील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(३६) * १६१० श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४४१२० ला दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकाक्षेत्रांमध्ये गत अनेक वर्षापासून कचऱ्याचा प्रश्न गंभीर झाल्यामुळे नागरीकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत असून महानगरपालिका व नगरपालिकेच्या कचऱ्यावर उपाययोजना करणाऱ्या यंत्रणाही कालबाह्य झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचऱ्याच्या गंभीर प्रश्नावर उपाययोजना करण्यासाठी दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांनी महानगरपालिकेचे आयुक्त व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्याशी व्हिडियो कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला असून नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी यासंदर्भात अलिकडेच सादरीकरण करुन शासनास माहिती दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार परिणामकारक उपाययोजना करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यासाठी किती कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतीमध्ये घनकचरा व्यवस्थापन करण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत केंद्र शासनामार्फत दरवर्षी देशातील सर्व शहरांचे स्वच्छतेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नेमलेल्या त्रयस्त यंत्रणेमार्फत सर्वेक्षण करण्यात येते.

त्यानुसार, स्वच्छ सर्वेक्षण-२०२० अंतर्गत केंद्र शासनाने नेमलेल्या त्रयस्त यंत्रणेमार्फत शहरांची तपासणी दिनांक ४ जानेवारी, २०२० पासून सुरू होणार असल्याने, या स्वच्छ सर्वेक्षणात राज्यातील शहरांनी चांगली कामगिरी करावी म्हणून मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी राज्यातील महानगरपालिकांचे आयुक्त व नगरपरिषदा/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे संवाद साधला होता.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत भूखंडाचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) * ५०३ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एपीएमसी मार्केट नवी मुंबईत स्थलांतरीत झाल्यानंतर व्यापाऱ्यांना गोदामे तयार करण्यासाठी सिडकोने रुपये १५ कोटी एवढ्या सवलतीच्या दरात दिलेल्या ४० हजार चौ.मीटर जागेवर आता व्यावसायिक संकुल उभे राहणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित दोषी सोसायटीने सिडकोची संमती न घेता तसेच अनेक मुळ व्यापाऱ्यांना सोसायटीमधून वगळून बनावट सदस्यांचा समावेश करुन केलेल्या गैरव्यवहारात सिडकोचे रुपये ९०० कोटींचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

ए.पी.एम.सी. न्यू बाँबे मर्चंट्स कॉमन वेअरहाऊसिंग यांना वाशी नोडमधील सेक्टर १९-एफ, भूखंड क्र.१ (२५०३३.७४ चौ.मी.) व भूखंड क्र.५ (१३१७२.८० चौ.मी.) हे भूखंड "वेअरहाऊसिंग" प्रयोजनासाठी दिनांक १८/०५/१९९८ रोजीच्या भाडेपट्टा करारनाम्यान्वये वाटप करण्यात आले आहेत. सदर संस्थेने सिडको महामंडळाची परवानगी न घेता परस्पर नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून दिनांक ३०/०८/२०११ रोजी भूखंडाचा वापर व्यापार प्रयोजनासाठी करुन घेतला आहे. भूखंड वाटपाच्या करारनाम्यातील अटीनुसार बांधकाम केले नसल्याने सदर संस्थेस सिडकोने दिनांक ७/१०/२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली असून प्रस्तुत प्रकरणाची चौकशी सिडकोच्या दक्षता विभागामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील गुंठेवारीतील मालमत्तेचे महसूल अभिलेखानुसार पीआर कार्डवर नोंद घेण्याबाबत

**(३८) * ७५८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमित होणाऱ्या नागरीकांच्या वसाहती मोठ्या प्रमाणात असून या ३० ते ३५ वर्षे जुन्या वसाहती शासनाच्या मार्गदर्शनानुसार व गुंठेवारी विकास कायद्यान्वये नियमित करणाचे काम औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका नागरिकांच्या मालमत्तेचे नियमितकरणानंतर मालकी हक्काच्या अनुषंगाने करावयाची पुर्तता महसुली अधिनियमांतर्गत होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वसाहतीतील मालमत्ताधारकांकडे त्यांच्या मालमत्तेचे सर्व कागदपत्रे असूनही त्यांची नावे महसूल अभिलेखानुसार पीआर कार्डवर आलेली नसल्याने त्यांना पीआर कार्ड देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांच्या गुंठेवारीतील मालमत्तेचे महसूल अभिलेखानुसार पीआर कार्डवर नोंद घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ चे कलम ४(१) च्या तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मिळकती/भूखंड नियमित करण्याकरीता दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाली असून त्यानुसार महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) व (४) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील तरतुदीनुसार भूखंड/मिळकतीचे नियमितीकरण झालेनंतर संबंधित मिळकत धारकांनी आवश्यक कागदपत्रांसह महसूल विभागाच्या अधिनस्त असलेल्या नगर भूमापन कार्यालयाकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर कंपन्याकडे महापालिकेची थकबाकी असल्याबाबत

**(३९) * १०१९ श्री.रविंद्र फाटक, श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर कंपन्याकडे महापालिकेची ११२ कोटी ८३ लाख मालमत्ता कराची थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर थकबाकी वसूल करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच मोबाईल टॉवर कंपन्याकडे एवढया मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी असण्याची कारणे काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ४७१ मोबाईल टॉवरच्या करापोटी दिनांक ०४/०२/२०२० पर्यंत एकूण रुपये ११३.७७ कोटी इतक्या रक्कमेची थकबाकी आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात एकूण ९ कंपन्यांचे मोबाईल टॉवर असून थकबाकीसह एकूण मागणी रुपये ११८.१० कोटी इतकी आहे.

त्यापैकी ४ कंपन्यांकडून सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात रुपये ४.३३ कोटी इतका मुळ मालमत्ता कर वसुल केलेला आहे.

५ कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात महानगरपालिकेने लावलेल्या शास्ती व व्याजाच्या विरोधात याचिका दाखल केल्या असून मा.उच्च न्यायालयाने सर्व प्रकरणी स्थगिती आदेश दिल्याने मालमत्ता कर वसुलीची कारवाई करता आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मा.उच्च न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश उठविण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे मेट्रो कारशेड स्थगिती अहवालाबाबत

**(४०) * ८७९ श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.महादेव जानकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.निलय नाईक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा ते सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाकरीता कारशेड सन २०१५ मध्ये आरे वसाहतीत उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते परंतु, शासनाने नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने सदर मेट्रो कारशेडसाठी कांजूरमार्ग येथे जागा सुचविलेली असतानाही कारशेडची कामे आरे वसाहतीतच सुरु करण्यात आल्यानंतर विविध कारणांमुळे पर्यावरणवाद्यांसह समाजाच्या विविधस्तरातून सदर मेट्रो कारशेड प्रकल्पास विरोध करण्यात आला असून त्यासाठी अनेकवेळा आंदोलने झाली व त्यामुळे शासनाने या कारशेड प्रकल्पास स्थगिती देण्याकरीता नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीच्या अहवालाचा थोडक्यात गोषवारा काय आहे तसेच समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने तसेच मेट्रो कारशेड प्रकल्पाला विलंब होऊन खर्च वाढणार नाही ही बाब विचारात घेता मेट्रो कारशेडसाठी मुंबईत पर्यायी जागा निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) आरे कॉलनीतील मेट्रो ३ च्या कारशेडकरीता निश्चित करण्यात आलेल्या जागेवर पर्यावरणीय समतोल साधणे, कारशेडचे बांधकाम करणे व त्या परिसरातील वृक्ष संपदा जतन करणे याबाबतचा अहवाल सादर करण्याकरीता, गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवाल शासनस्तरावर तपासण्यात आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांनी बंदरामध्ये लागणाऱ्या बोटींना अधिक पाणी देवून गैरव्यवहार केल्याबाबत

**(४१) * ६७० श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २ अभियंत्यांनी गत १७ वर्षापासून शिवडी ते डॉकयार्ड रोड परिसरातील ६ बंदरामध्ये लागणाऱ्या बोटींना दररोज ३ लाख लिटरहून अधिक पाणी गैरमार्गाने देवून सुमारे ६८० कोटी रुपयांचा महसूल बुडवून गैरव्यवहार केल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेच्या बैठकीत स्थायी समिती अध्यक्ष तसेच अन्य सदस्यांनी निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोषी अभियंत्यांविरोधात शासनाकडून कारवाई करण्याऐवजी त्यांना बढती देण्याची प्रक्रिया सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक ०७/०१/२०२० रोजी झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महानगरपालिका सभागृहात, एका अभियंत्याने शिवडी ते डॉकयार्ड परिसरात पाणी वाटपात केलेली अनियमितता तसेच एका अभियंत्याने रुग्णालयाच्या कामांमध्ये केलेली अनियमितता याबाबत चर्चा झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) सदर दोन्ही अभियंत्यांवर महानगरपालिका सभागृहात करण्यात आलेल्या आरोपांबाबत महानगरपालिका प्रशासनाने समाधानकारक खुलासा करुन, त्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या मंजुरीकरीता सादर करावा असे महानगरपालिका सभागृहाने सूचित केले.

त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## अकोला शहरामध्ये रिलायन्स, जियो, स्टरलाईट टेक या खाजगी दूरसंचार कंपनीने अनधिकृतरित्या रस्त्यांचे खोदकाम केल्याबाबत

**(४२) * ९६० श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरामध्ये रिलायन्स, जियो, स्टारलाईट टेक या खाजगी दूरसंचार कंपनीने महानगरपालिका किंवा कोणत्याही विभागाची परवानगी न घेता अनधिकृतरित्या मोठ्या प्रमाणात केबल टाकण्याच्या कामाकरीता महत्वाच्या रस्त्यांचे खोदकाम केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खोदकामामुळे शहरातील महत्वाच्या रस्त्यांची दुरवस्था झाली असून अनेक नागरिकांचे छोटे मोठे अपघात होऊन निष्पाप लोकांचा बळी जावून सदर खोदकामामुळे वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात प्रतिकूल परिणाम होऊन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने महानगरपालिकेचा सुमारे ३० कोटी रुपयांचा महसूल बुडविल्यामुळे उक्त कंपनीवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याबाबत महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत आयुक्त, अकोला महानगरपालिका यांना आदेश देऊनसुध्दा कारवाई करण्यास दिरंगाई करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अकोला शहरात दूरसंचार कंपन्यांनी महानगरपालिकेची परवानगी न घेता, खोदकाम करुन, अनधिकृतरित्या मोठ्या प्रमाणात केबल टाकल्यासंदर्भात जानेवारी, २०२० मध्ये वृत्तपत्रात बातमी आली होती हे खरे आहे.

(२) सदरचे ओएफसी केबल टाकण्यासाठी केलेले खोदकाम हे एचडीडी मशीनव्दारा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

या खोदकामामुळे शहरात छोटे-मोठे अपघात झाल्याबाबत अथवा शहराच्या वाहतुकीवर प्रतिकुल परिणाम झाल्याबाबत महापालिकेकडे कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे, महानगरपालिकेच्या अहवालात नमूद आहे.

(३), (४) व (५) महापालिकेची पूर्व परवानगी न घेता एकूण ७९ रस्त्यावर एकूण ६६.५५ कि.मी. लांबीची अनधिकृतरित्या ओएफसी केबल टाकल्याचे महापालिकेच्या प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

सदरच्या वाहिन्या टाकण्याचे काम सन २००८ पासून सुरु असल्याची बाबही निदर्शनास आलेली आहे.

यासंदर्भात सद्य:स्थितीत महानगरपालिकेने रिलायन्स जिओ इन्फोकॉम कंपनीच्या अधिकाऱ्यांविरुध्द पोलीस तक्रार दाखल केली आहे.

शहरात टाकण्यात आलेल्या दूरसंचार वाहिन्यांमध्ये अनेक कंपन्यांचा समावेश असून, नेमकी कोणती वाहिनी, कोणत्या कंपनीची आहे याबाबत स्पष्टता होत नसल्याने, या संपूर्ण प्रकरणात सर्व कंपन्यांच्या प्रतिनिधीसमवेत बैठका घेऊन वाहिन्यांची पडताळणी करण्यात येत आहे.

पडताळणीअंती पुढील उचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आल्याचे महानगरपालिका अहवालात नमूद केले आहे.

-----------------

## मुंबई व पुणे येथील गृह प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४३) * ६०५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व पुणे येथील ११७ गृह प्रकल्प प्रलंबित असल्याने पैसे भरुनही दोन लाख ग्राहक घरांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक २६ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोन लाख ग्राहकांना घरे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) व (२) हे खरे नाही. कैंद्रिय स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ महाराष्ट्र राज्यात दिनांक ०१ मे, २०१७ पासून लागू करण्यात आला आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम ३(१) नुसार दिनांक ०१/०५/२०१७ पूर्वीचे तथापि, पूर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate) अप्राप्त बांधकाम प्रकल्प व नविन बांधकाम प्रकल्प यांना महारेराकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अशा नोंदणीकृत प्रकल्पांपैकी मुंबई विभागातील ७५१७ तक्रारी व पुणे विभागातून २२१२ तक्रारी महारेराकडे प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने मुंबई विभागातील ५५४४ तर पुणे विभागातील १६१८ तक्रारी महारेराव्दारे निकाली काढण्यात आल्या असून उर्वरित प्रकरणांमध्ये सुनावणीची प्रक्रिया महारेराकडे सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महापालिकेचे ओपन लँड टॅक्स विकासकाने थकविल्याबाबत

**(४४) * २३१५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेतील अधिकाऱ्यांशी संगनमत करुन १८५३ बड्या कंपन्या आणि विकासकांनी नगररचना, मालमत्ता, पाणी विभागासह मोकळया जमिनीवरील कर बुडवून ५३५ कोटींचा गैरव्यवहार केल्यामुळे मालमत्ता आणि पाणी करासह सन २०१० ते सन २०१७ या ७ वर्षात ९० कोटी रुपयांची थकबाकी असल्याने सदर महापालिकेला नुकसान झाल्याचा आरोप स्थानिक नगरसेवकांनी माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या महासभेत केल्यानंतर मुळात सन १९८० पासून आजतागायत विकासकांनी ३९५ कोटींचा ओपन लँड टॅक्स न भरता इमारती उभारल्याचे निदर्शनास आले असून नगरविकास तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोषी कंपन्या व विकासकांची यादी जाहीर करुनही उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वाधिक मालमत्ता कर वसूल करणाऱ्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून निवासी मालमत्तांना आजमितीस ७१ टक्के तर वाणिज्य मालमत्तांना ८३ टक्के कर आकारणी केली जात असून उक्त महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हलाखीची असतानाही ओपन लँड टॅक्स मध्ये ६७ टक्के करमाफी देण्यात आली असून विकासकांना सरसकट भरघोस कर सवलत देणाऱ्या मनपा प्रशासनाकडून निवासी सदनिकाधारकांना गत दोन वर्षापासून कर सवलत देण्याची मागणी होत असताना कल्याण-डोंबिवली मनपा प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विकासकांकडून व कंपन्याकडून सदर थकबाकीची रक्कम वसूल करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील निवासी सदनिकांना करमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी ५३५ कोटीचा गैरव्यवहार केला, हे खरे नाही.

दिनांक १०/०९/२०१९ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ओपन लँड टॅक्स तसेच मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत चर्चा झाली आहे.

सन १९८० पासून विकासकांनी ओपन लँड टॅक्स न भरता इमारती उभारल्या अशी वस्तुस्थिती नाही.

नगरविकास तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोषी कंपन्या व विकासकाची यादी जाहीर केलेली नसल्याने चौकशी करण्यात आलेली नसल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील निवासी मालमत्तांना करयोग्य मुल्याच्या ७१.५० टक्के व वाणिज्य मालमत्तांना ८०.५० टक्के इतका मालमत्ता कर आकारला जातो.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ओपन लँड टॅक्सचे करयोग्य मुल्य १० टक्यावरून ३.४६ टक्के इतके केले आहे. तथापि, त्यावरील मालमत्ता करात कोणताही बदल न करता तो ७१.५० टक्के इतकाच ठेवण्यात आला आहे.

दिनांक ११/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये ६०० चौ. फुटापर्यंतच्या अनधिकृत निवासी सदनिकांच्या मालमत्ता करावर शास्ती लादली जात नाही.

दिनांक १५/०९/२०१८ ते ३०/११/२०१८ या कालावधीत व्याज माफीची “अभय योजना” राबविण्यात आली असून त्याचा लाभ निवासी सदनिकाधारकांना मिळाला आहे.

मालमत्ता कराची वसुली करण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून नियमानुसार नियमित कारवाई करण्यात येते.

महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत सुधारीत परवानगी अथवा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मालमत्ता कर पूर्णपणे वसुल केल्यानंतरच देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी, हिल रोडवरील लालबहादूर शास्त्री उद्यानाच्या परिसरातील काही भागावर बेकायदेशीररित्या कब्जा करण्यात आल्याबाबत

**(४५) * १५२७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, हिल रोडवरील लालबहादूर शास्त्री उद्यानाच्या परिसरातील काही भागावर एका खान नामक व्यक्तीने बेकायदेशीररित्या कब्जा केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्यानात चोरीच्या घटना आणि गर्दुल्ल्यांचे प्रमाणही वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार अनधिकृतरित्या कब्जा करणाऱ्या दोषी व्यक्तीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) याबाबतची बातमी दिनांक १९/०१/२०२० रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) वरळी टेकडी येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे जलाशय असून, सदर जलाशयातून जी/दक्षिण विभागातील परिसराला पाणीपुरवठा करण्यात येतो.

सदर जलाशयाच्या बाजूला सर्व्हे क्रमांक ४५, १/४५ व २/४५ या भूखंडावर लालबहादूर शास्त्री उद्यान स्थित असून, सदर उद्यानाचे एकूण क्षेत्रफळ ४४,०३१ चौ.मी. इतके आहे.

सदर भूखंड सन १९२१ साली बी.आय.टी. (बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट) ने ताब्यात घेतला होता. त्यावेळी सदर भूखंडाच्या काही भागावर दर्गा असल्याची नोंद बी.आय.टी.कडे होती.

बी.आय.टी.च्या दिनांक २४/०२/१९३० रोजीच्या ठरावानुसार बी.आय.टी. चा समावेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये करण्यात आला. त्यावेळी सर्व्हे क्रमांक ४५ चे ४५, १/४५ व २/४५ असे विभाजन करण्यात आले. त्याचवेळी विभाजन करण्यात आलेल्या सर्व्हे क्रमांक ४५ या भूभागावरील १८३७.८० चौ.मी. इतका भूभाग बी.आय.टी.मार्फत दर्गा ट्रस्टला देण्यात आला.

तद्नंतर सर्व्हे क्रमांक ४५, १/४५ व २/४५ या भूभागाच्या मालमत्ता पत्रकावर दर्गा ट्रस्टची नोंद झाल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर, महानगरपालिकेने त्याविरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ४८८/१९८१ दाखल केली. सदर याचिकेतील दिनांक १२/११/१९८४ रोजी मा.उच्च न्यायालयाने, सर्व्हे क्रमांक १/४५ व २/४५ हा भूभाग महानगरपालिकेच्या मालकीचा असल्याबाबत निर्णय दिला. त्यानुसार सदर भूभागाच्या मालमत्ता पत्रकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेची नोंद करुन घेण्यात आली.

सदर नोंदीनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने भूमी अभिलेख विभागामार्फत सर्व्हे क्रमांक १/४५ व २/४५ चे सीमांकन दिनांक २७/०३/१९८७ रोजी करुन घेतले.

तद्नंतर दर्गा ट्रस्टने भूभाग क्रमांक १/४५ व २/४५ या भूभागावर मालकी हक्क असल्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सुट क्रमांक २२९७/१९९१ रोजी दावा दाखल केला.

तथापि, मा.उच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र बदलल्यामुळे सदर प्रकरण सुट क्रमांक ११०२१५/१९९१ अन्वये मा.नगर दिवाणी न्यायालय, मुंबई येथे वर्ग करण्यात आले आहे.

मा.नगर दिवाणी न्यायालयाने सदर भूभागाच्या मालकी हक्काबाबत दर्गा ट्रस्टकडे पुरावे मागितले असून, सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ६ मार्च, २०२० रोजी ठेवण्यात आली आहे.

सदर ठिकाणी स्थानिक पोलीस स्टेशनकडून नियमितपणे गस्त घालण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## मौजे फुरसुंगी (ता.हवेली, जि.पुणे) येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याबाबत

**(४६) * २५०० श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणेश नगर, मौजे फुरसुंगी (ता.हवेली, जि.पुणे) येथील वॉर्ड क्र.१ मधील रस्ते सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यासाठी पुणे मनपा घनकचरा विभागांतर्गत निविदा क्र.७१-२०१४ नुसार निविदा काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे मनपा घनकचरा विभागांतर्गत श्रीजी टेक्स्टाईल ते हरपळे टेम्पो सर्व्हिसपर्यंतच्या रस्त्याचे काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदेमध्ये हरपळे टेम्पो सर्व्हिस ते शब्दमंदार कुंज येथील रस्ता कॉंक्रीटीकरण करण्याबाबत उल्लेख असतानाही कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांनी उर्वरित राहिलेले रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार उर्वरित राहिलेला रस्ता पुणे मनपा घनकचरा विभागामार्फत तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, निविदा काढण्यात आली हे खरे आहे. त्यावेळी हा भाग ग्रामपंचायत हद्दीत होता. मात्र कचरा डेपोसंदर्भात तेथील ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने तेथील वार्ड क्र.१ मधील रस्ते महानगरपालिकेने करून देण्याचा निर्णय घेण्यात आला होता व त्यानुसार ही निविदा काढण्यात आली होती.

(२), (३) व (४) श्रीजी टेक्स्टाईल ते हरपळे टेम्पो सर्व्हिस या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात आले आहे. तसेच श्रीजी टेक्स्टाईल ते शब्दमंदार कुंज असा रस्ता करण्याचे नियोजन होते. मात्र हरपळे टेम्पो सर्व्हिस ते शब्दमंदार कुंज दरम्यान खाजगी व्यक्तींच्या जागा असल्याने रस्ता कॉंक्रिट करणे शक्य झाले नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साखरे (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील शासकीय गोदामाची दुरवस्था झाल्याबबत

**(४७) * २३२१ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरे (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील शासकीय तहसिल कार्यालयाच्या संकुलातील स्वस्त रेशनिंग धान्य ठेवण्याकरीता असलेल्या गोदामाची दुरवस्था झाली असून दिनांक २४ जून, २०१९ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (जव्हार) यांचेकडील गोदाम दुरुस्तीचा प्रस्ताव ठेकेदारामार्फत जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखरे येथील शासकीय गोदामाची तात्काळ दुरुस्ती व पुनर्रचना करण्याकरीता व त्याच्या अंमलबजावणीसाठी ‘समर्थन’ संस्थेने दिनांक २० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा तसेच जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे निवेदने सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिनांक २४ जून, २०१९ रोजी रुपये ३६.९० लक्ष किंमतीचे गोदाम दुरुस्तीचे अंदाजपत्रक जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर यांना सादर केले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) दुरुस्ती अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर दुरुस्तीचे काम हाती घेता येईल.

-----------------

## मुंबईत झोपडपट्टी विकास प्राधिकरण (एस.आर.ए.) योजनेंतर्गत मिळणाऱ्या सदनिकांचे क्षेत्रफळात वाढ करण्याबाबत

**(४८) * २३४० श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत झोपडपट्टी विकास प्राधिकरण (एस.आर.ए.) योजनेंतर्गत मिळणाऱ्या सदनिकांचे क्षेत्रफळ पाचशे चौरस फुट करण्याच्या मागणीचे पत्र मुंबईचे पालकमंत्री महोदयांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसआरए योजनेंतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या सदनिका पाचशे चौरस फुटांच्या दिल्या तर झोपडपट्टीधारकांचे राहणीमान उंचावून त्यांना हक्काची जागा मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगर क्षेत्रासाठीच्या अंतिम सुधारित विकास नियंत्रण नियमावली २०१४-२०३४ मध्ये विनियम ३३(१०) नुसार राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये पुनर्वसन सदनिकांचे आकारमान २५ चौ.मी. ऐवजी २७.८८ चौ.मी. करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(३) झोपडीधारकांना द्यावयाच्या अधिक आकारमानाच्या घरांबाबत विश्लेषणात्मक अहवाल तयार करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालातील

शिफारशी विचारात घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील पुनर्वसन सदनिकांचे चटई क्षेत्र २५ चौ.मी. (२६९ चौ.फुट) वरुन २७.८८ चौ.मी. (३०० चौ.फुट) इतके वाढविण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मलबार कंबाला हिल, मुंबई येथील इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(४९) * २३९६ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने विकासक मे.कृष्णा आणि कं. यांना सन २००१ मध्ये सी.एस.क्र. ६४८, मलबार कंबाला हिल विभाग, इमारत क्र. १७ आणि १९/ए, अल्माऊंट मार्ग, डी वॉर्ड, मुंबई या इमारतीच्या पुनर्विकासासाठी दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार चटई क्षेत्र निर्देशांक २.५ आणि मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळास देय अतिरिक्त क्षेत्रफळ ३१२.६६ चौरस मीटर होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरविकास विभागाने माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये जारी केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने चटई क्षेत्र निर्देशांक ३ मध्ये मंडळास देय अतिरिक्त क्षेत्रफळ ९६०.४६ चौरस मीटर नुसार सुधारीत आराखड्याला मंजूरी दिल्यापासून ३० दिवसांच्या आत आणि प्रकल्पाचे पुढील काम करण्यासाठी आवश्यक असणारे कमन्समेंट सर्टिफिकेट जारी करण्याआधी विकासकाला मंडळासोबत ९६०.४६ चौरस मीटर अतिरिक्त क्षेत्रफळ हस्तांतरीत करण्यासाठी करारपत्र करणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाबींकडे संबंधित विकासक व अधिकाऱ्यांनी हेतु:पुरस्सरपणे दुर्लक्ष केल्याने मंडळाचे जवळपास ६० कोटी बाजारभाव असणाऱ्या ९६०.४६ चौरस मीटर अतिरिक्त क्षेत्रफळाचे नुकसान झाल्यामुळे

दोषींवर कारवाई करावी अशी मागणी श्री.शकील पाटणी, सामाजिक कार्यकर्ता यांनी लेखी अर्जाव्दारे मा.मंत्री, गृहनिर्माण, सचिव, गृहनिर्माण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अर्जावर कार्यवाही करुन संबंधित विकासक व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच संबंधित विकासकाला तात्काळ काळया यादीत समाविष्ट करून त्याला भविष्यात कोणत्याही प्रकल्पात समाविष्ट न करून घेण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. चटई क्षेत्र निर्देशांक ३.०० नुसार ९६०.४६ चौरस मीटर इतके अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास हस्तांतरीत करण्याचा करारनामा विकासकामार्फत दिनांक २४/१२/२०१८ रोजी करण्यात आला आहे.

(३) श्री.शकील पाटणी, सामाजिक कार्यकर्ता यांनी लेखी अर्जाव्दारे मा.मंत्री, गृहनिर्माण, सचिव, गृहनिर्माण विभाग यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने म्हाडा व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडून दिनांक २५/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून, सद्य:स्थितीत इमारत रिक्त आहे. सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र व करारनाम्यानुसार जोपर्यंत अतिरिक्त क्षेत्रफळ म्हाडाच्या ताब्यात येत नाही, तो पर्यंत ना-हरकत प्रमाणपत्र धारकास विक्रीयोग्य गाळयांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी आवश्यक असलेले म्हाडाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, असे म्हाडाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर रुग्णालयाचे शासनाकडे हस्तांतरण करून घेण्याबाबत

**(५०) * १३३५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर या दोन्ही रुग्णालयातून नागरिकांना चांगली आरोग्य सेवा मिळण्याकरीता अगोदरची मंजूर पदे रिक्त असतानाही नवीन ८३ पदांना दिनांक ४ जून, २०१५ च्या शासन निर्णय, क्र.कडोंमपा-१००७/४५३/प्र.क्र.१८३/०७/नवि.२८ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजुरी आस्थापना खर्चाची अट शिथिल करून देण्यात आलेली असून अगोदरपासून रिक्त असलेली व नव्याने मंजूर करण्यात आलेल्या पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीने गत १० वर्षापासून दोन्ही रुग्णालये शासनाने हस्तांतरीत करून घेण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक ०४ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची अट शिथील करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१(४) अन्वये वैद्यकीय अधिकारी संवर्गाच्या ८३ पदांना शासन मंजूरी देण्यात आलेली आहे.

शास्त्रीनगर रूग्णालयासह इतर रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी / तज्ञांची पदे भरण्यासाठी नोव्हेंबर, २०१५ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, अपेक्षित प्रतिसाद न लाभल्याने सदरची पदे भरता आलेली नाही.

सद्य:स्थितीत ८ वैद्यकीय अधिकारी ठोक मानधनावर कार्यरत असून त्यांचेमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे रूक्मिणीबाई रूग्णालय व शास्त्रीनगर सामान्य रूग्णालय शासनाकडे हस्तांतरीत करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे, हे खरे आहे.

बाई रूक्मिणीबाई रूग्णालय हस्तांतरीत करण्यासंदर्भातील प्रस्तावास सार्वजनिक आरोग्य विभागाने सहमती दर्शविलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऐराली (नवी मुंबई) येथे उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबाबत

**(५१) * १६११ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील ऐरोली, सेक्टर १५ मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचे काम गत ९ वर्षांपासून नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मारकाचा आराखडा कशाप्रकारे निश्चित करण्यात आलेला आहे, यासाठी किती निधीची आवश्यकता असून प्रत्यक्षात किती निधी, केव्हा उपलब्ध करण्यात आला आहे व त्याचा विनियोग कशाप्रकारे करण्यात आला आहे,

(३) तसेच उक्त स्मारकाचे काम अतिशय मंदगतीने सुरु असून गत नऊ वर्षात कोणतीही प्रगती झालेली नसल्यामुळे सदर कामात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त स्मारकाच्या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन कामे पूर्ण होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे बांधकाम सन २०११ मध्ये सुरू करण्यात येऊन पहिल्या टप्प्यात मुख्य इमारत, बहुउद्देशीय कक्ष, प्रार्थना स्थळ, वस्तुसंग्रहालय, कलादालन, पोडीयम गार्डन, संमेलन कक्ष, लॉन इत्यादी कामे २०१७ मध्ये पूर्ण झालेली आहेत.

सदर कामासाठी रुपये २४.४२ कोटी इतका खर्च झालेला आहे.

दुसऱ्या टप्प्यात सदर स्मारकाच्या डोमला मार्बल आच्छादन करण्यासाठी रुपये १४.६१ कोटी रक्कमेच्या कामास २०१८ मध्ये कार्यादेश देण्यात आले असून सदर काम डिसेंबर, २०२० अखेरीस पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

त्याचप्रमाणे स्मारकाच्यांतर्गत सजावटीसाठी रुपये १०.३३ कोटी रक्कमेच्या कामास सन २०१८ मध्ये कार्यादेश देण्यात आले असून सदर काम मे, २०२० अखेरीस पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधण्याच्या कामात गैरव्यवहार झाला अशा आशयाच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या नसल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबाबत महानगरपालिकेने पुरेशा निधीची तरतूद केली आहे.

-----------------

## मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाच्या कंत्राटदार कंपनीकडून मुरुमाची चोरी करण्यात आल्याबाबत

**(५२) * ४८४ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गाच्या मुख्य कंत्राटदार व उपकंत्राटदार कंपनीने बेकायदेशीरपणे वर्धा जिल्हयातील केळझर येथील सुमारे १०३ एकर जमिनीतील शेकडो कोटींचा मुरुम चोरुन नेल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

पोलीस उपनिरीक्षक, सेलू, जि.वर्धा यांनी त्यांचे पत्र क्र.१०८३/२०१ दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये, मे.कोझी प्रॉपर्टीज प्रा.लि. यांनी त्यांच्या मालकीच्या मौजा केळझर येथील सर्व्हे क्र. ६१३/१ व ६१३/२ मधील अंदाजे १०० एकर जमिनीतून माती व मुरुम चोरी करुन मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. तसेच त्यांचे उपकंत्राटदार मे.एम.पी. कंन्स्ट्रक्शन (आशिष दप्तरी) यांनी समृध्दी महामार्गाच्या कामाकरीता वापरल्याची तक्रार दिनांक ३०/०७/२०१९ रोजी पोलीस स्टेशनला दिली असल्याचे महामंडळाच्या नागपूर शिबिर कार्यालयास कळविले आहे.

(२) सदर प्रकरणात पोलीस विभागाने दिनांक २२/०८/२०१९ रोजी मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. तसेच त्यांचे उपकंत्राटदारावर भादंवीच्या कलम ३७९, ४४७, ४२७, १२० (ब) व ३४ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. त्यानुसार पोलिसांनी श्री.अनिलकुमार, प्रकल्प संचालक, मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना दिनांक १३/११/२०१९ रोजी अटक केली. या प्रकरणात मा.सत्र न्यायालय, वर्धा

येथील सुनावणी दरम्यान दिनांक ३०/११/२०१९ रोजी श्री.अनिलकुमार यांना जामिनावर मुक्तता करण्याचे आदेशित केले. सदर प्रकरणात पोलीस विभागातर्फे पुढील तपास सुरु आहे.

सदर प्रकरणात तहसिलदार, सेलू यांनी त्यांचे आदेश क्र.रा.मा.क्रं.एम.एन.एन.एल.-३७/कावि-८२१/१९-२०, दिनांक १७/१२/२०१९ अन्वये उक्त उल्लेखित जमिनीतून मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. व त्यांचे उपकंत्राटदार मे.एम.पी. कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा. अशिष दप्तरी) यांनी एकूण ३०२५२८.१२ ब्रास अनधिकृत उत्खन्नन केल्याबाबत कंत्राटदारावर बाजारमुल्याच्या आधारे दंड रुपये २२६,८९,६०,९००/- व रॉयल्टी रुपये १२,१०,११,२४८/- असे एकूण रुपये २३८,९९,७२,१४८/- एवढ्या रक्कमेची दंडात्मक आकारणी प्रस्तावित केली आहे. कंत्राटदाराने याबाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४१५/२०२० दाखल केली. सदर याचिकेवरील दिनांक २१/०१/२०२० च्या सुनावणीत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी सदर दंडाच्या वसुलीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर प्रोजेक्टस लिमिटेड कंपनीमार्फत तयार करण्यात आलेल्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(५३) * १७०८ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर प्रोजेक्टस लिमिटेड या कंपनीने सफाळे ते टेंभीखोडावे रस्ता रुंदीकरणाचे काम हायब्रिड ॲन्युईटी प्रकल्पांतर्गत अंदाजे २३ कोटी ३६ लाख रुपये खर्च करुन पूर्ण करण्यात आलेला असून सदर रस्ता रहदारीकरीता खुला करण्यात आल्यानंतर अवघ्या २४ तासातच त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत रेडीमिक्स पध्दतीने तयार करण्यात आलेला रस्त्याची गुणवत्ता तपासण्यात आली होती काय तसेच निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सफाळे ते टेंभीखोडावे हे काम हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर असून काम अद्याप सुरू झालेले नाही. दरम्यान माहे डिसेंबर, २०१९ च्या अखेरीस सवलतदारामार्फत या रस्त्यातील खड्यांची दुरूस्तीकरून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवणेसाठी डांबरीकरणाचे काम करण्यात आले होते. सदर डांबरीकरणाचे काम काही प्रमाणात खराब झालेले होते.
(२) सदर कामाचा दर्जा तपासणीबाबत कामाचे स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) यांना तात्काळ सूचना देण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या सूचनेप्रमाणे दुरूस्तीचे काम पुनश्च: उद्योजकाकडून करून घेण्यात आलेले आहे. मुळ काम लवकरच हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील केईएम रुग्णालयात ईसीजी यंत्र तसेच मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणा बंद असल्याबाबत

**(५४) * ८९२ श्री.प्रविण दरेकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळ, (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयात ईसीजी यंत्रामध्ये बिघाड झाल्यामुळे होरपळलेल्या ३ महिन्याच्या प्रिन्स राजभर या बालरुग्णाचा दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील रोपण शस्त्रक्रिया गत दोन वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच केईएम रुग्णालयाच्या मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणा व्यवस्थित व नियमित कार्यरत नसल्याने अनेक विभागातील कार्यक्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम होत असून याचा सर्वाधिक त्रास अतिसंवेदनशील विभागामध्ये दाखल असलेल्या रुग्णांना होत असल्याचे दिनांक १८ ऑक्टोंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त सर्व बाबीं प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयाच्या बालरोग विभागातील अतिदक्षता विभागात (PICU) प्रिन्स पन्हेलाल राजभर याला दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१९ रोजी अत्यंत गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आले होते. सदर बालरुग्णावर तातडीने उपचार सुरु करुन त्यास वेन्टीलेटरवर ठेवण्यात आले होते.

दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१९ रोजी बालरुग्णाला लावलेल्या मल्टीपॅरामॉनिटरच्या केबलमधून आग लागल्याने बालरुग्णाचा डावा हात, खांदा व कान भाजला होता. दोन आठवड्याच्या उपचारानंतर दिनांक २२/११/२०१९ रोजी बालरुग्णाचा दुर्देवी मृत्यू झाला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) केईएममधील रोपण शस्त्रक्रियेबाबतची बातमी दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(३) केईएममधील वातानुकूलन यंत्रणेबाबतची बातमी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

**<u>प्रिन्स राजभर मृत्यू</u>**

प्रिन्स राजभर मृत्यू प्रकरणी भोईवाडा पोलीस ठाणे येथे दिनांक १३/११/२०१९ रोजी प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करण्यात आला असून, भोईवाडा पोलीस ठाणेमार्फत चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच सदर दुर्घटनेची चौकशी करण्याकरीता संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये) व मुख्य अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांची व्दिसदस्यीय समिती दिनांक ११/११/२०१९ रोजी गठीत करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

याशिवाय, सदर प्रकरणाची नि:पक्ष सखोल चौकशी करण्याकरीता दिनांक १२/१२/२०१९ रोजी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई यांचेमार्फत घटनेशी संबंधित क्षेत्रातील तज्ञ जसे-बालरोग तज्ञ, एन.आय.सी.यू. तज्ञ, बायोटेक इंजिनिअर, इलेक्ट्रीकल इंजिनिअर इत्यादींचा समावेश असलेली एकूण ६ सदस्यांची समिती अधीक्षक, सर जे.जे. रुग्णालय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे.

**<u>रोपण शस्त्रक्रिया</u>**

के.ई.एम. रुग्णालयातील रोपण शस्त्रक्रिया आजतागायत सुरु आहे.

**<u>वातानुकूलन यंत्रणा</u>**

सदर रुग्णालयाच्या विविध विभागांमध्ये मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणाव्दारे वातानुकूलन सेवा पुरविण्यात येते. सदर यंत्रणा व्यवस्थित व नियमित कार्यरत असून त्यांचे नियमितपणे परिरक्षण करण्यात येते.

तसेच, सदर रुग्णालयातील आपत्कालीन वैद्यकीय सेवा विभागात ५ वातानुकूलन संयंत्रे कार्यरत आहेत. तथापि, सदर संयंत्रे बदलून त्याजागी अधिक क्षमतेची ५ वातानुकूलन संयंत्रे बसविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २७/०२/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.

-----------------

# नवी मुंबईतील पामबीच मार्गावरील तिवरांच्या झाडांची कत्तल केल्याबाबत

**(५५) * १२८७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील पामबीच मार्गावरील एनआरआय कॉम्लेक्सनजीकच्या सुमारे १५.५ हेक्टरचा भूखंड सिडकोने गोल्फ कोर्स आणि १७ निवासी इमारती बांधण्यासाठी एका विकासकाला दिलेला असून या भूखंडावरील तिवराचे जंगल तोडले जाऊ नये यासाठी पर्यावरणप्रेमीनी सन २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असता, या याचिकेवरील सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने या प्रकल्पाला आणि भूखंडावरील तिवराची झाडे तोडायला स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पामबीच लगतच्या सदर वादग्रस्त भूखंडावरील ७०० तिवराची झाडे तोडली जाऊ नयेत असा मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिलेला असतानाही दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास रविवारच्या सुट्टीचा फायदा घेत ऑटोमॅटिक कटरने झाडे तोडून मिस्त्री कन्सट्रक्शनने सदरहू जागा सपाट केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश असतानाही विकासकाने बेकायदेशीररित्या ७०० तिवराच्या झाडांच्या केलेल्या कत्तलीबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

सिडकोने महाराष्ट्र ॲडव्हान्टेज प्रकल्पांतर्गत नवी मुंबईमध्ये नेरुळ येथे एक गोल्फकोर्स प्रस्तावित केले असून त्यातील एकूण ५ भूखंडापैकी ३ भूखंड गोल्फकोर्ससाठी तर उर्वरित २ भूखंड रहिवास प्रयोजनासाठी निश्चित करण्यात आले आहेत. मा.उच्च न्यायालयाने गोल्फकोर्स विकसित

करण्याकरीता निर्धारित केलेल्या ३ भूखंडापैकी २ भूखंड विकसित करण्यास स्थगिती दिली होती. मात्र सदर आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १९/०७/२०१९ रोजीच्या आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर वादग्रस्त भूखंडावरील ७०० तिवारांची झाडे तोडण्याबाबत सिडको महामंडळाकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. परंतु रहिवास प्रयोजनाकरीता विकसित करण्यात येत असलेल्या २ भूखंडावरील सुबाभुळ, काटेबाभुळ इ. झाडे तोडण्यास सिडकोकडून विहित कार्यपध्दतीनुसार परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिका स्वच्छता सर्वेक्षणाच्या अनुक्रमांकात राज्यात शेवटून तिसऱ्या क्रमांकावर असल्याबाबत

**(५६) * ११४८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका स्वच्छता सर्वेक्षणाच्या अनुक्रमांकात राज्यात शेवटून तिसऱ्या क्रमांकावर असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला महानगरपालिका स्वच्छतेवर दर महिन्याला दोन कोटी रुपये खर्च करीत असतानाही तिसऱ्या क्रमांकावर जाण्यामागची कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासनामार्फत करण्यात येत आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण-२०१९ चा निकाल मार्च, २०१९ मध्ये जाहीर झाला.

या जाहीर झालेल्या निकालानुसार अकोला महानगरपालिकेचा देशातील अमृत शहरांच्या क्रमवारीत २१७ वा क्रमांक होता. तर, राज्यातील एकूण ४३ अमृत शहरांच्या क्रमवारीत अकोला मनपाचा क्रमांक ४१ वा होता, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सन २०१६ मध्ये अकोला महानगरपालिका क्षेत्रात हद्दवाढ करून २४ गावांचा समावेश करण्यात आला.

सदर २४ गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाकरीता कोणतीही यंत्रणा उपलब्ध नव्हती. या हद्दवाढीमुळे नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्रासह महानगरपालिकेतील उर्वरित क्षेत्रामध्ये उभारण्यात आलेल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या व्यवस्थेवर, तेथील कंत्राटी कामगारांच्या आस्थापना खर्चावर तसेच सामुदायिक शौचालयाच्या स्वच्छतेकरीता अकोला महानगरपालिकेमार्फत दरमहा रूपये २ कोटी खर्च करण्यात येतो.

स्वच्छ सर्वेक्षण-२०१९ च्या तपासणीतील मानकांनुसार अकोला महानगरपालिकेने घनकचऱ्याचे संकलन करणे, वर्गीकरण करणे व त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करणे यामध्ये आवश्यक सुधारणा न केल्याने तसेच हागणदारी मुक्त शहरांतर्गत ओडीएफ + दर्जा प्राप्त न केल्याने स्वच्छ सर्वेक्षण-२०१९ मध्ये अकोला महानगरपालिकेची चांगली कामगिरी होवू शकली नाही.

यासंदर्भात महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनांतर्गत आपली कामगिरी सुधारून तसेच शहरास ओडीएफ+/ओडीएफ++ मानांकन प्राप्त करून स्वच्छ सर्वेक्षण-२०२० मध्ये आपली कामगिरी सुधारण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील शास्त्रीनगर रुग्णालयाच्या आरोग्य सेवेचा दर्जा खालावल्याबाबत

**(५७) * ११४२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील कल्याण-डोंबिवली मनपाच्या डोंबिवली येथील शास्त्रीनगर रुग्णालयाच्या आरोग्य सेवेचा दर्जा खालावला असून १२० खाटांच्या या रुग्णालयावर किमान ३०० रुग्णाचा भार पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात चार स्त्रीरोगतज्ज्ञ, दोन बालरोगतज्ज्ञ, दोन भूलतज्ज्ञ, दोन सर्जन अशा डॉक्टरांची आवश्यकता असून कमी वेतन व जास्त काम यामुळे नवीन डॉक्टर्स या रुग्णालयात येण्यास इच्छुक नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ठोक वेतनावर त्वरीत डॉक्टरांची नियुक्ती करावी तसेच इतरही अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविण्यात याव्या याकरीता रुग्णालयाचे जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पाठपुरावा करीत असूनही आवश्यक कार्यवाही करण्याबाबत दिरंगाई होत असल्याने रुग्णांची प्रामुख्याने प्रसुतिकागृहातील माता-बाल रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही,

डोंबिवली येथील शास्त्रीनगर रूग्णालयाची क्षमता १२० खाटांची असून या रूग्णालयात ६० ते ७० रूग्णांवर अंतररूग्ण विभागात उपचार करण्यात येतात. तसेच प्रतिदिन सरासरी ७०० ते ७५० बाह्यरूग्णांवर उपचार करण्यात येतात.

त्यामुळे सदर रूग्णालयाची आरोग्य सेवा खालावली, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) अंशत: खरे आहे.

शास्त्रीनगर रूग्णालयात चार स्त्रीरोगतज्ज्ञ, दोन बालरोगतज्ज्ञ, दोन भूलतज्ज्ञ व दोन सर्जन आवश्यक असताना सद्य:स्थितीत स्त्रीरोग व प्रसुतीतज्ज्ञ-१, बालरोगतज्ज्ञ-१ व भुलतज्ज्ञ-१ असे वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून त्यांचेमार्फत रूग्णांना सेवा दिली जाते.

शास्त्रीनगर रूग्णालयासह इतर रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी / तज्ञांची पदे भरण्यासाठी नोव्हेंबर, २०१५ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, अपेक्षित प्रतिसाद न लाभल्याने सदरची पदे भरता आलेली नाही.

(३) व (४) सद्य:स्थितीत ८ वैद्यकीय अधिकारी ठोक मानधनावर कार्यरत असून त्यांचेमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

माता व बाल रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता महानगरपालिका स्तरावर खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांचे पॅनल तयार करण्यात आले असून आवश्यकतेनुसार रूग्णालयात बोलावून माता व बाल रूग्णांवर औषधोपचार करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलुंड पूर्व येथील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घरांचा ताबा बांग्लादेशी नागरिकांना भाडेतत्वावर दिल्याबाबत

**(५८) * २३१६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड पूर्व येथील गवाणपाडा परिसरात पीएमजीपी अंतर्गत म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घरांचा अवैध्यरित्या ताबा घेत दलालांनी सदर खोल्या बांगलादेशी नागरिकांना भाडेतत्वावर दिल्याचे गतवर्षी केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संक्रमण शिबिराला भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसतानाही १७९ रिक्त खोल्यापैकी ८ खोल्यांचे टाळे तोडून दलालांनी बांग्लादेशी नागरिकांना भाडेतत्वावर देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे नाही. मुलुंड पूर्व गव्हाणपाडा संक्रमण शिबिरातील इमारतनिहाय गाळ्यांची तपासणी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दिनांक ०९/११/२०१७ रोजी केली होती. तपासणीअंती मुलुंड पूर्व गव्हाणपाडा संक्रमण शिबिरातील एकाही गाळ्यामध्ये बांग्लादेशी घुसखोर वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले नसल्याचा म्हाडाचा अहवाल आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, वितरीत केलेल्या गाळ्यांपैकी काही गाळे गाळेधारकांनी भाड्याने दिल्याचे निदर्शनास आले असल्याबाबत म्हाडाचा अहवाल आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडोर आणि नैना या दोन्ही प्रकल्पांची ठरलेल्या मुद्यानुसार अंमलबजावणी करण्याबाबत

**(५९) * २३४१ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे : दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३९०४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडोर आणि नैना या दोन्ही प्रकल्पांची ठरलेल्या मुद्यानुसार अंमलबजावणी केली जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग-विरार मल्टिमॉडेल कॉरिडोर प्रकल्पाच्या नव्या आराखड्यामुळे एम.एम.आर.डी.ए.ची अंमलबजावणी होत नसल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी मागण्या मान्य न झाल्यास प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी सिडकोसोबत वारंवार झालेल्या बैठकीनंतरही लवादांना सुचविलेल्या मुद्यानुसार अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन माहे जानेवारी, २०२० मध्ये प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.
(३), (४) व (५) अलिबाग-विरार मल्टीमॉडल कॉरिडोर नैना क्षेत्रातून जाणाऱ्या लांबीपैकी नैना क्षेत्रातील प्रस्तावित नगर रचना परियोजना क्र. १, २ व ३ मधील लांबीकरीता नगर रचना परियोजनेच्या माध्यमातून जमीन उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. या ३ नगर रचना परियोजना पैकी क्र. १ ची प्राथमिक नगर रचना परियोजना शासनाने मंजूर केली असून सदर नगर रचना परियोजना लवादाकडून अंतिम होऊन शासनाकडे मंजूरी करीता प्राप्त झाल्यावर नगर रचना परियोजनेस अंतिम मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अन्य क्षेत्रातील लांबीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून भूसंपादन करण्याच्या माध्यमातून जमीन उपलब्ध करण्यात येत आहे. रायगड जिल्हयातील एकूण ६९ गावांपैकी ३४ गावांमध्ये संयुक्त मोजणीचे काम पूर्ण झाले असून, पनवेल तालुक्यातील ५ गावांचे मुल्यांकन जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात आले आहे.

-----------------

**विधान भवन :** **श्री.राजेंद्र भागवत**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.